# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

**दिनांक २०.१०.२०१८ रोजी (का.प.क्र.२०) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

शनिवार दिनांक २० ऑक्टोबर २०१८ रोजी (का.प.क्र.२०) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.४० वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.अति. आयुक्त श्री.संतोष कवडे, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| ५. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ६. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ७. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ८. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ९. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| १०. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| ११. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १२. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १३. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १४. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १५. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १६. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १७. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १८. | स.स. श्रीमती परवीन खैसर खान |
| १९. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २०. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २१. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २२. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २३. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २४. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २५. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| २६. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| २७. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| २८. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |

| | |
|---|---|
| २९. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३०. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३१. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३२. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३३. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३४. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३५. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३६. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३७. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ३८. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ३९. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ४०. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४१. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४२. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४३. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४४. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ४५. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ४६. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ४७. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ४८. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ४९. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५०. | स.स. श्री.गादगे शितल विरभद्र |
| ५१. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५२. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५३. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ५४. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ५५. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ५६. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ५७. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ५८. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ५९. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६०. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |
| ६१. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६२. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ६३. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ६४. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ६५. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |

| | |
|---|---|
| ६६. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ६७. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ६८. | स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे |
| ६९. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७०. | स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन |
| ७१. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७२. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७३. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७४. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ७५. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७६. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ७७. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७८. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ७९. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ८०. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८१. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८२. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८३. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८४. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ८५. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ८६. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ८७. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ८८. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
२. श्री.कांबळे चेतन जनार्धन

श्री.सिताराम सुरे :स.सदस्य श्री.पुनमचंद बमणे यांच्या मातोश्री स्व.धनाबाई बमणे यांचे दु:खद निधन झाले त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :माजी स.सदस्या श्रीमती अंजली कोंडेकर यांचेही निधन झाले. श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.कैलास गायकवाड :माजी महापौर मनमोहनसिंग ओबेरॉय यांचे दु:खद निधन झाले. त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.जमीर कादरी :माजी विरोधी पक्षनेते श्री.अफसर खान यांचे बंधु स्व.सलीम खान व स.सदस्य श्री.फेरोज खान यांचे वडील स्व.मोईनुद्दीन खान यांचेही दु:खद निधन झाले. त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :पडेगाव येथे झाड कोसळून श्री.सय्यद सोहेल स.अजमद यांचा मृत्यू झाला. त्यासही श्रध्दांजली अर्पण करावी. तसेच ही घटना महापालिका हद्दीत येत असल्याने त्यांचे कूटूंबीयांना रु.५ ते रु.१० लक्ष पर्यत आर्थीक मदत द्यावी.

श्री.विकास जैन :काल पंजाब राज्यात अमृतसर येथे रेल्वेला अपघात होऊन जे मृत्यूमूखी पडले त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

यास स.सदस्य श्री.भाऊसाहेब जगताप, श्री.बन्सी ग्यानु जाधव, श्रीमती जयश्री मोरे, श्री.अब्दुल नाईकवाडी यांनी अनुमोदन दिले.

मा.महापौर :ठिक आहे. श्रध्दांजली अर्पण करणेसाठी सर्वांनी उभे रहावे.

यावेळी स्व.धन्नाबाई बमणे, स्व.सलीम खान, स्व.मनमोहनसिंग ओबेरॉय, स्व.अंजली कोंडेकर स्व.मोईनुद्दीन खान यांचे दुःखद निधन झाल्याने तसेच पडेगाव येथे झाड कोसळून श्री.सय्यद सोहेल स.अजमद यांचे व पंजाब येथे रेल्वे अपघातात मृत्यूमूखी पडलेल्यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

मा.महापौर :मा.आयुक्त रजेवर गेल्याने त्यांचा चार्ज जिल्हाधिकारी श्री.उदय चौधरी यांचेकडे आहे. परंतु ते उपस्थित राहू शकत नसल्याने मनपाचे अति.आयुक्त श्री.संतोष कवडे हे आजच्या सभेचे प्रशासन म्हणून काम पाहतील.

श्री.प्रमोद राठोड :शासनाकडून कोणते अधिकारी येथे आले व कोणत्या अधिकाऱ्याकडे कोणत्या विभागाचा चार्ज आहे. माहिती द्यावी. काही दिवसांपूर्वी या सभागृहात सदस्यांना येण्यासाठी बंदी केली आहे तसे सुरक्षा रक्षकांना आदेशीत केलेले होते. तशी सुरक्षा रक्षकांना ताकीद द्यावी. जे की, ते सदस्य सभागृहात येऊ नये.

श्री.त्र्यंबक तुपे :नवीन अधिकारी येतात. माहिती मिळत नाही. विषय पत्रिका सात दिवस अगोदर काढली. प्रशासनासह अधिकारी यांना माहिती असते. अनेक विषय सभेत असतात. महापालिकेकडे रु.१६० कोटीचे देणे आहे. १५ दिवसात रु.२०० कोटीचे देणे होणार आहे. उत्पन्नाच्या बाबीवर चर्चा होणे अपेक्षीत आहे.आयुक्त असणे आवश्यक होते. मोजकेच अंदाजपत्रक मंजूरीसाठी, बाकीचे थांबविले आहे का? स्थायी समितीमध्ये शिक्षकांना मानधन वाढविण्याचा विषय तो विषय या सभेला येणे आवश्यक होते. उत्पन्न शुन्य असतांना मानधन वाढविणे, नवीन गाड्या खरेदी करणे, जागेचा मोबदला देणे, असे प्रस्ताव घेणे योग्य आहे का? उत्पन्न वाढविणेसाठी काय केले? खर्चाला लगाम घातला पाहिजे. सर्व बाबतीत चर्चा होऊन ठोस निर्णय घ्यावा.

मा.महापौर :स.सदस्य श्री.प्रमोद राठोड यांनी सुचना केल्यानुसार स.श्री.सय्यद मतीन रशीद यांना सभागृहात प्रवेश न देणे बाबत सभागृहात निर्णय झाला होता. त्यानुसार सुरक्षा रक्षक यांना आदेशीत करण्यात येते की, श्री.सय्यद मतीन रशीद यांना सभागृहात प्रवेश देऊ नये.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:महिलासाठी शौचालयाचा प्रश्न मार्गी लागत नाही. अधिकारी काम करीत नाही. योग्य तो निर्णय घ्यावा.

मा.महापौर :औरंगपूरा येथील शौचालयाचे काम होत आले आहे. पाहणी केली, तसेच टी.व्ही.सेन्टर, सेव्हनहिल, बेगमपूरा येथील शौचालयाचे काम प्रगतीवर आहे. मी स्वतः लक्ष घालतो आहे. अधिकारी यांनी पुढील कार्यवाही करावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:बाजार पेठेतील कमर्शियल इमारतीला परवानगी घेताना शौचालय असल्याचे दाखवून परवानगी घेतली. परंतु जागेवर प्रत्यक्षात शौचालय नाही. ते असते तर शौचालयाचा प्रॉब्लेम आला नसता.

श्रीमती सिमा खरात :सप्टेंबर महिन्याच्या बैठकीत १५ दिवसात शौचालयाचे काम होईल. असे म्हटले होते. तीन वर्षापासून समिती केली पाच महिला सदस्या आहेत. आता सन-२०१८ चालू आहे. डीबी स्टार मध्ये बातमी आली की, औरंगपूरा येथील शौचालयात नाल्याचे पाणी वापरात आणत आहे. हे सत्य आहे का? दोन दिवसात उत्तर देणार होते.

मा.महापौर :शौचालयाचा विषय महत्वाचा पाच सहा महिन्यात किती खर्च झाला? किती उत्पन्न आले? याची माहिती समोर यावी.

कार्य.अभियंता :जेव्हा पाया उभारणीचे काम चालू होते, त्यावेळची ती घटना आहे. आता तेथे आरआरसीची टाकी बांधली आहे. टँकरद्वारे पाणी देतो. तेथील काम ९० टक्के काम झाले आहे. लवकरच लोकार्पण करता येईल.

श्रीमती सिमा खरात :टी.व्ही.सेन्टरचे शौचालय का होत नाही?

कार्य.अभियंता :एक्स्प्रेशन ऑफ इन्ट्रेस मागविले होते. रिस्पॉन्स मिळाला नाही. मध्यंतरी सुलभ इंटरनॅशनल एजन्सीला बोलविले होते. त्यानी ६५ ठिकाणी सर्वे केला ते सीएसआरच्या माध्यमातून बांधून देणार आहे. स्वत: डीपीआर नकाशे तयार करणार आहे. वार्ड अभियंता मार्फत जागा दाखविणेची कार्यवाही होत आहे. या महिन्याच्या शेवटी औरंगपूरा येथील शौचालय सुरू होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :वादग्रस्त नसेल अशा १० जागा द्याव्यात. त्यावर सीएसआर मधून पैसे उपलब्ध करून शौचालय बांधता येईल. ती जबाबदारी आम्ही घेतो.

मा.महापौर :जालना रोडला ब्रीज खाली बांधण्याचे सुचविले होते. ४-५ जागा तर ब्रीज खाली उपलब्ध होतील.

कार्य.अभियंता :सीएसआरच्या माध्यमातून तेथे बांधायचे आहे. संबंधीत एजन्सीशी संपर्क करतो आहे.ते आऊट ऑफ आहे.

श्रीमती संगीता वाघुले :दोन तीन वर्षापासून महिला शौचालयाचा विषय मांडतो. वैयक्तिक शौचालयही होत नाही. अधिकारी सांगितलेले काम करीत नाही. मनमानी पणे काम करतात वारवांर बैठकाच होतात. आऊटपुट काहीच नाही. बजेट मध्ये तरतूद केली ते मंजूर होईल तेव्हा काम करू असे सांगतात. महिलांसाठी व वैयक्तिक शौचालयाचा विषय मार्गी लावावा. आजच्या सभेत ठोस निर्णय घ्यावा.

श्रीमती माधुरी देशमुख :दोन वर्षापासून नुसत्या व्हिजीट करतो. किती शौचालय तयार आहे? सुरू केव्हा करणार आहोत?

कार्य.अभियंता :औरंगपूरा येथील शौचालय ३० ऑक्टोबरपर्यंत लोकार्पण करणार आहे.

श्रीमती माधुरी देशमुख :विमान प्राधिकरणाने स्वच्छतागृहासाठी निधी दिला. त्यातून किती स्वच्छतागृह बांधले? तो निधी मनपात वर्ग झाला का? ते स्वत: बांधून देणार की मनपास निधी देणार? कोणत्या शाळेसाठी निधी दिला? त्या स्वच्छतागृहाची आजची स्थिती काय आहे?

कार्य.अभियंता :विमान प्राधिकरणाने रु.८३.५० लक्ष देण्याचे कबूल केले. रु.२५ व रु.३३ लक्ष असे दोन हप्ते प्राप्त झाले. १९ शाळांमध्ये २७ टॉयलेट बांधायचे आहे. आठ

शाळामध्ये काम पुर्ण केले. ९ शाळांमध्ये काम प्रगतीपथावर आहे. यादी आहे देण्यात येईल.

श्रीमती माधुरी देशमुख :शाळेत मी भेट दिली. एन-७ च्या शाळेत ४६० विद्यार्थी असून एक स्वच्छतागृह आहे. त्याची दयनीय अवस्था आहे. त्यास दरवाजे नाहीत. जे बांधले ते चालू केले नाही.

कार्य.अभियंता :ब्रीजवाडी येथे चालू केले आहे. नारेगाव येथे पाणी नसल्याने ते सध्या बंद आहे.

मा.महापौर :मा.आयुक्तांनी संबंधीत अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा घ्यावा की, शौचालयाचे काम का होत नाही? खुलासा समाधानकारक नसेल तर कार्यवाही करण्यात येईल. महिला सदस्य असतील व इतर सदस्य यांचे जे प्रश्न असेल ते सोडविणेसाठी प्रशासनाने एक परिपत्रक काढून सर्व अधिकारी यांना ताकीद द्यावी. वेळीच कार्यवाही करावी. जे अधिकारी काम करणार नाही त्यांचेवर कार्यवाही करावी. सर्व अधिकारी यांनी फोन घेतले जावे.

श्रीमती माधुरी देशमुख :दोन आमदार शौचालयासाठी निधी देणेस तयार आहेत. मनपास जागा द्यायची आहे.

कार्य.अभियंता :महिला शौचालयाचे काम ताबडतोब करण्यात येईल. औरंगपूरा येथील शौचालय ३० ऑक्टोबर पर्यंत सुरू करता येईल. मा.आमदार यांना त्यांचे मतदार संघात टॉयलेट करावे. अशा सुचना होत्या.

श्री.राजेंद्र जंजाळ :अनेक वेळा मुद्दा समोर आला. जे काम होणे अपेक्षीत होते ते झाले नाही. सीएसआरच्या निधी किती आला? आणखी काही लोक निधी देण्यास तयार आहेत? असे असतांना काम का होत नाही? शौचालयाचे काम केव्हा पुर्ण होणार आहे? कालावधी घ्यावा. होत नसेल तर अधिकाऱ्यांनी राजीनामा द्यावा किंवा त्यांना सभागृहाच्या बाहेर काढावे. अशी परिस्थिती निर्माण झाली की, नळ जोडणी संचिकेवर सह्या करण्यास अधिकारी नाही. कामाची जबाबदारी फिक्स करावी.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी यांनी कोणते शौचालय केव्हा सुरू होणार आहे? शिवाय कामाची स्थिती काय आहे? याचा खुलासा करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :एकाही प्रोजेक्टचे काम श्री.अफसर सिद्दीकी यांनी पुर्ण केले नाही.

श्री.विकास जैन :गेल्या सहा महिन्यापासून पाणीपुरवठा, लाईटची कामे मंजूर होत नाही. काही टेंडर झाले तर एजन्सी फिक्सींग होत नाही. बजेट मध्ये कामे असतांना अंदाजपत्रक मंजूर होत नाही. निधी नाही असे सांगतात. एक दुसऱ्या विभागात संचिका पाठविण्याचे काम चालू आहे. आजच्या सभेत एक अंदाजपत्रक रु.९९ लक्षचे आले इतरही वार्डातील यावे. संचिकेवर रिमार्क दिला जातो. पुन्हा स्टेटमेंन्ट मागविले जाते. हे योग्य नाही ठोस निर्णय घ्यावा.

श्रीमती ज्योती नाडे :६-७ दिवसानंतरही पाणी येत नाही. बौध्दनगर व हनुमान चौकात ८ घरांना पाणी येत नाही. संचिका एक दुसऱ्या विभागात रिमार्क देऊन पाठविल्या जातात मंजूर होत नाही.

श्रीमती मनीषा मुंढे :सात दिवसाआड पाणी येते तेही वेळेवर नाही.

या वेळी सदस्य एकाच वेळी बोलत असतात. घोषणा देतात.

मा.महापौर :सभा १० मिनिटांसाठी तहकूब करण्यात येते. (वेळ १२-३० वा.पुन्हा १२-४० वा सभेला सुरूवात.)

श्री.राजू शिंदे :रस्त्यासाठी १०० व कचऱ्यासाठी रु.९० कोटी शासनाने दिले असतांना कचरा, रस्ता व पाणी चे प्रश्न सुटत नाही.

श्री.कैलास गायकवाड :पाणीपुरवठ्याच्या एजन्सी फिक्सींगच्या संचिकेचा निपटारा करण्याचे आदेशीत केले होते. काय झाले?

श्री.दिलीप थोरात :दोन दिवसाचा पाणीपुरवठा तीन दिवसानंतर केला तरी पाणी मिळत नाही.

श्री भगवान घडमोडे :पाणी विषय महत्वाचा असून ५-६ दिवसानंतरही पाणी येत नाही. वेळ निश्चित नाही. दुषीत पाणी बंद करीत नाही. व्हॉल्वचे काम होत नाही. ठेकेदारास बील देत नाही म्हणून ठेकेदार काम करीत नाही. लाईट बंद आहेत. नागरीकांच्या समस्या वाढत आहे. काही ठराविक वार्डाचे अंदाजपत्रक येत आहे. अत्यावश्यक सेवेसाठी पैसे नाही असे सांगतात. व्यायामासाठी जीम करीता रु.५ कोटीचे टेंडर काढले जाते. पाणी प्रश्न महत्वाचा आहे तो सोडवावा.

श्री.प्रमोद राठोड :राज्य शासनाकडून निधी मिळाला. रस्ते, कचरा प्रश्न सुटत नाही. पाण्याचा प्रश्न आहे. टँकरचे पैसे नागरीकांकडून जमा करतो. तरी त्यांना पाणी देत नाही. टँकर मालक सांगतो की, मी टँकर बंद करतो. याला अर्थ नाही. भुमिगतचा विषय गंभीर प्रशासन कोणते काम करीत आहे? जयभवानी नगर मध्ये नाल्याचे व ड्रेनेज लाईन टाकण्याचे थांबविले.

श्री.राजू शिंदे :लिकीजेस काढणेसाठी पैसे नाही सांगतात. टँकर मालकास रु.६१ लक्षचा चेक दिला कुणाच्या आदेशाने दिले?

श्री.प्रमोद राठोड :कोणाकडे कोणता चार्ज आह? माहिती होत नाही.

मा.महापौर :सर्वांनी जागेवर बसावे जागेवरून बोलावे. नसता कार्यवाही करावी लागेल.

श्री.नासेर सिद्दीकी :आमच्या वार्डातील संचीकेचे काय झाले?

यावेळी काही सदस्य डायस समोर उभे असतात.

मा.महापौर :स.श्री.नासेर सिद्दीकी यांचे एक दिवसांसाठी सभासदत्व रद्द करण्यात येते.

पुन्हा काही वेळानंतर रद्द केलेले सभासदत्वाचा निर्णय मागे घेण्यात येते.

श्री.नासेर सिद्दीकी :पाणी,कचरा आरोग्य कोणतेच प्रश्न सुटत नाही. अधिकारी काम करीत नाही.

श्रीमती मनीषा मुंढे :माझे वार्डात नाल्यात लाईन टाकली नाही. नाला खोदून ठेवला. चार वर्ष झाले काम होत नाही. सात दिवसाआड पाणी येते.

श्रीमती ज्योती नाडे :माझे वार्डात पाण्याचा प्रश्न आहे. तो का सुटत नाही?

उपअभियंता-श्री फालक :चिकलठाणा भागात बौध्दवाडा व पोलीस चौकी येथील पाणीपुरवठ्याची कामे करणेसाठी दोन टेंडर मंजुरीसाठी, वाटाघाटीसाठी बोलविले होते. देखभाल

दुरूस्तीचे काम सुरू केले. ठेकेदाराचे पेमेंन्ट दिले नाही म्हणून काम थांबविले होते पुन्हा सुरू केले.

श्रीमती अंकिता विधाते :ठेकेदार कोणतेच काम करण्यास तयार नाही? त्यांचे बिल का मिळत नाही? लिकिजेस, ड्रेनेज चोकअप झाले ती सुध्दा कामे होत नाही.

श्री.भगवान घडमोडे :विकास कामासंदर्भात किती देणे आहे? व वसुली सध्या मनपाकडे किती रक्कम जमा आहे?

श्री.सिताराम सुरे :दीड वर्षापासून दुषीत पाण्याचा प्रश्न आहे. टेंडर झाले एजन्सी फिक्सींग केले काम होत नाही.

कार्य.अभियंता :२ टक्के रक्कम भरण्याचे ठेकेदाराला लेटर दिले

मा.महापौर :दर निश्चितीकरण, वर्क ऑर्डर व काही स्थायी समितीला पाठविण्याचे विषय होते. एकूण ६२ पाणी पुरवठ्याच्या संचिका आहेत. त्या बाबतीत काय कार्यवाही केली?

कार्य.अभियंता :ह्या संचिका बाबत नव्याने ॲनॅलेसीस झाले. येत्या २२ तारखेला स्थायी समितीकडे संचिका ठेवून अंतिम करणार आहे.

मा.महापौर :सर्व संचिका मंजूर कराव्यात.

श्रीमती सिमा चक्रनारायण:दुषीत पाण्याचा प्रश्न दोन व्हॉल बसवायचे, चार पाईप टाकायचे तो प्रश्न सुटत नाही. शेजारच्या वार्डात काम चालू आहे. आमच्या वार्डात काम होत नाही.

कार्य.अभियंता :नुर कन्स्ट्रक्शनचे काम आहे. त्यांनी पाईप आणून टाकले. त्यांचे रु.४ कोटी बील थकले म्हणून काम करीत नाही. देखभाल दुरूस्तीची कामे दोन दिवसात सुरू होतील.

श्री.दिलीप थोरात :देखभाल दुरूस्तीच्या कामाचे पैसे ठेकेदाराला तात्काळ द्यावे.

मुख्य लेखाधिकारी :बरेच देयके प्रलंबीत आहे. जे देयक पारीत होऊन व्हाऊचर प्रदान अभावी प्रलंबीत आहेत ते रु.१६८ कोटीचे आहे. जे की, त्यात पाईपलाईनचे नाही. उत्पन्नाचा तपशिल एप्रिल मध्ये रु.५३ कोटी मे-रु.४५ कोटी, जून-रु.३७ लक्ष, जुलै-रु.३५ लक्ष, ऑगस्ट-रु.३० लक्ष, सप्टेंबर-रु.३३ लक्ष या महिन्यात रु.३४.३८ लक्ष असा तपशिल आहे. रु.३०४ कोटी आपल्या तिजोरीमध्ये प्राप्त झालेले आहे त्यांचे अगेन्स खर्च करतो आहे. उत्पन्नाची गती कमी खर्च जास्त होतो आहे. हे सभागृह धोरण ठरविते. याची मुख्य यंत्रणा मा.आयुक्त यांचे डायरेक्शनुसार पुढील कार्यवाही करीत असतो. पाणीपुरवठा इतर मेन्टनंन्सची कामाचे चेक बँकेकडे देत आहोत. काल मुद्रांकाचा धनादेश क्लिअर झाला त्यामूळे हे करण्यात आले आहे.

श्री.राजू शिंदे :लिकिजेसचे काम केले जात नाही. रु.६१ लक्ष टँकरचे पेमेंन्ट कुणाच्या आदेशान्वये दिले? कोणत्या कामाला प्राधान्य दिले जावे? हा प्रशासनाचा प्रश्न आहे.

मुख्य लेखाधिकारी :मा.आयुक्तांशी चर्चा झाली होती. तसेच स.स.श्री.प्रमोद राठोड, श्री.वानखेडे राजगौरव याचा ही फोन होता.

श्री.प्रमोद राठोड :टँकरचे पैसे पहिले नागरीकांकडून वसुल करतात. त्यांना पाणी मिळाले पाहिजे की नाही, त्यासाठी टँकर मालकास पैसे देणे गरजेचे आहे की नाही. वार्डातील टँकर बंद होऊ नये. अशी आमची मागणी आहे.

या वेळी अनेक सदस्य मोठमोठ्याने बोलत असतात.

श्री.गंगाधर ढगे :आमच्या वार्डात रु.५-५ लक्षचे बील दिले जात नाही वर्षापासून काम थांबले.

श्री.भगवान घडमोडे :ज्या वार्डात काम थांबले ते सदस्य फोन करणारच आहे. शासकीय अनुदानातून किती खर्च केले का?

श्री.त्र्यंबक तुपे :सभेचे निर्णय जे होतात त्यानुसारच निर्णय मा.आयुक्त मान्य करतात. सदस्यांनी सांगितले म्हणून पैसे दिले असे बोलणे योग्य नाही. पुर्वीचे बील आहे

ती बिले प्राधान्यक्रम लावून दिली पाहिजे. तातडीचे कामे थांबली जाऊ नये. उत्पन्न कमी येत नाही. देखभाल दुरूस्तीची कामे होत नाही. वसुली करण्याचे काम प्रशासनाचे आहे. अनेक आऊट सोर्सींगचे कर्मचारी आहे वसुली का होत नाही? प्रशासनाची काय भुमिका आहे? टँकरचे पैसे नागरीकांकडून वसूल करतो तर टँकरचे पैसे द्यावेच लागणार होते. रु.१६८ कोटीची बिले सुध्दा दिली जावी.

श्री.प्रमोद राठोड :कोणत्या अधिकाऱ्यांनी किती वसुली केली? नावे सांगावी.

श्री.भगवान घडमोडे :शासनाचे आलेले अनुदान इतर कामासाठी वापरले का तसेच एलईडी लाईट बसविले बील कमी येणार होते. परंतु पुर्वीचेच बील येत आहे. याकडे लक्ष देत नाही. कचऱ्यावर किती खर्च होतो? अधिकारी माहिती देत नाही. खाजगी एजन्सीकडून कर्मचारी घेतले वर्क आऊट काय आहे? माहिती नाही तुपे नावाचे कर्मचारी ॲन्टीकरप्शन मध्ये अडकले काय कार्यवाही केली?

श्री.प्रमोद राठोड :दोन महिन्यात किती निधी शासनाकडून आला? व किती खर्च कोणत्या कामावर केला?

श्री.दिलीप थोरात :ज्या भागातून वसुली जास्त तेथे विकास कामे जास्त करावी.

श्रीमती संगीता वाघुले :कब्रस्तानमध्ये ड्रेनेजचे पाणी जात आहे. ते काम होत नाही.

श्री.जमीर कादरी :अधिकारी फोन घेत नाही लाईट बंद आहे अनेक विकास कामाच्या संचिका थांबून आहे. ठोस निर्णय होत नाही. एलईडी लावले तर लाईट बील कमी यायला पाहिजे. परंतु पुर्वीचेच बील भरणा होत आहे. एजन्सी सुध्दा काम करीत आहे. दोन्हीकडे पैसे दिले जात आहे. आऊट सोर्सिंगचे कर्मचारी घेतले त्यांना वेळेवर पेमेन्ट दिले जात नाही. ते काम करीत नाही. वसुली होत नाही. जे वसुली करणार नाही. कार्यवाही करावी. पाणी येत नाही. लाईट बंद आहे. देखभाल दुरूस्तीचे कामे होत नाही.

श्रीमती सुमित्रा हाळनोर :वार्डात बैठक आयोजित केली तर अधिकारी येत नाही. रामगोपालनगर भागात दुषीत पाण्याचा प्रश्न आहे.

श्रीमती मुल्ला सलीमा बेगम:हमालवाडा भागात दुषीत पाणी येते. पिण्याचे पाणी कमी येते.

श्री रामेश्वर भादवे :वार्डात कचऱ्यासाठी रिक्षा व काही एजन्सीचे लेबर आवश्यकता नसतांना दिले. रु.५०,०००/- एक्स्ट्रा खर्च होत आहे. हायवेवर ट्रक उभे आहे. भाडे दिले जाते. आऊट सोर्सिंगचे किती कर्मचारी आहेत? खर्च किती करतो? माहिती घ्यावी.

श्री.मनोज बल्लाळ :शिक्षकांच्या मानधनात वाढी बाबत स्थायी समितीला प्रस्ताव आहे. रु.३०-४० लक्ष खर्च जास्त लागणार आहे. आर्थीक परिस्थिती चांगली नाही. त्यामुळे मानधन वाढवू नये. आऊट सोर्सिंगचे कर्मचारी कीती व कुठे काम करतात सदस्यांना माहिती द्यावी.

श्रीमती वैशाली जाधव :५-६ व्या दिवशी पाणी येत होते. वेळ निश्तित नाही. रात्रीच्या वेळी १ ते २ वाजता पाणी येते. शहानगर भागात पाण्याची व्यवस्था करणेसाठीची संचिका मंजूर होत नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :तीन महिन्यापासून वार्डात दुषीत पाणी येते. खड्डे खोदून ठेवले काम का होत नाही? तेथे अपघात होऊ शकतो.

श्रीमती कमल नरोटे :जुनी मुकूंदवाडी भागात महादेव मंदीराच्या गल्लीत ७-८ घरांना पाणी जात नाही. पाईप टाकले जात नाही.

मा.महापौर :स.सदस्यांनी सांगितले म्हणून पेमेन्ट दिले. असे मुख्य लेखाधिकारी यांनी बोलणे योग्य नाही. जबाबदारीने उत्तर देणे अपेक्षीत आहे. सभागृहाने धोरण निश्चित करणे, आदेश करणे, सभागृहाचे काम आहे. प्रशासन आर्थीक नियोजन करण्यास सक्षम असेल तर उर्वरीत बीले ही प्रलंबीत राहायला नको, खर्च व उत्पन्न ताळमेळ बसविण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे. निधी अभावी अंदाजपत्रक होत नाहीत. संचिका मंजूर होत नाही. टी.व्ही.सेन्टरची व्यापारी संकुलची संचिका प्रलंबीत आहे. ती निकाली काढावी. त्या लोकांकडून पैसे घेतले त्यांना गाळे द्यायचे आहे. मेन्टेनन्सची कामे तातडीने करावीत. बील तातडीने द्यावे. पाणी पुरवठ्याचे पैसे द्यावे असे मा.आयुक्तांनी अनेक वेळा सांगीतले का दिले नाही? सभागृह जे निर्णय देईल त्याप्रमाणे काम करावे. दोन जेसीबीचे पैसे दिले नाही म्हणून आणता आले नाही. दुषीत पाण्याच्या तक्रारी एक वर्षापासून सुटत नाही. समांतर पाईप विषय निघाला. किती पाईप होते? कुठे वापरले उत्तर मिळत नाही? जे जे आदेश हे सभागृह देते त्याचे पालन करावे. रोशनगेट भागात पिण्याचे पाणी रस्त्यावर वाहते.लक्ष दिले जात नाही. टाकीवर नियंत्रणासाठी अभियंता लक्ष देण्यास नसतात. सारा वैभव भागात टँकर सुरू करायचे सांगीतले केले नाही. दुषीत पाण्याचे प्रश्न सुटत नाही. प्रशासन काय नियोजन करते? त्याची माहिती पदाधिकारी यांना दिली जावी. विविध माध्यमातून शासकीय अनुदान स्वरूपात जो निधी येतो. त्याचे नियोजन करावे. इल्लिगल नळ जोडणी करून रू.१४०० घेऊन लिगल करावे. त्या मिळकतधारकाने मालमत्ता कर भरलेला असावा ही अट त्यात असावी. इल्लिगल घरे लिगल करावीत. त्यात अटी शर्ती शिथील केल्या आहेत त्याप्रमाणे कार्यवाही करावी. शासकीय अनुदान किती येते? त्यातून किती रक्कम दिली जाते? उत्पन्न वाढविण्यासाठी विशेष सभा घेतली जाईल. खर्चामध्ये काटकसर करावी उत्पन्न वाढवावे. विकास कामाची बीले देतांना प्राधान्यक्रम असावा. वार्ड समिती सभापती बैठक आयोजित करतात. त्यावेळी सर्व संबंधीत अधिकारी बैठकीला उपस्थित रहावे. सर्व अधिकारी यांनी सदस्यांनी फोन केल्यास ते घेतले पाहिजे. वाटर टँकर माध्यमातून मिळणारे उत्पन्न व खर्चाचे वेगळे अकाऊंट करावे. जे पैसे जमा होतात. त्यातून बील देण्यात यावे. वसुलीवर विषेश भर द्यावा. आता अर्ध्या तासासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ दु.२.१० वा.तहकुब व पुन्हा २.४५ वा.सभेला सुरूवात.)

श्री.त्र्यंबक तुपे :पंतप्रधान आवास योजनेच्या संचिका प्रलंबीत आहेत. त्यांची माहिती पुढील सभेत द्यावी.

मा.महापौर :रमाई आवास योजना, पंतप्रधान आवास योजना असेल त्यांचे बुकलेट बनवून आजची परिस्थिती व लाभार्थी किती आहेत? त्याची माहिती सर्व सदस्यांना द्यावी.

श्री.राजू शिंदे :प्रशासनातील अधिकारी काम करीत नाहीत. कोणतेच नियोजन नसते.

उपमहापौर :अनेक भागात ६-७ दिवसाआड पाणी येते. सणांचे दिवस असतांना सदस्यांना सामोरे जावे लागते. ड्रेनेज चोकअप असेल दुषीत पाणी असेल प्रश्न सुटत नाही. ६२ संचिका वाटाघाटीसाठी प्रंलबीत आहेत. त्या निकाली का काढल्या जात नाही?

मा.महापौर :पाणी पुरवठयाच्या तसेच दुषीत पाण्याच्या संचिका निकाली काढाव्यात. नुर कन्स्ट्रक्शनचे रु.१० लक्ष बील देण्याच्या सुचना केल्या होत्या. बीले दिले नाही. लाईट, पाणी पुरवठा, ड्रेनेज जी-जी कामे असतील मेन्टेनन्सची कामे प्राधान्याने करावीत.

मुख्य लेखाधिकारी :नुर कन्स्ट्रक्शनचे पेमेन्ट केलेले आहे. येणाऱ्या अमाऊंटचा चेक क्लिअर झालेला नव्हता. त्यामुळे त्यांना लवकर देऊ शकलो नाही.

श्री.राजू शिंदे :छोट्या छोट्या कामांची बीले का दिली जात नाहीत? वसुली जी होईल त्यातून पगार द्यावे.

श्री.राजगौरव वानखेडे :मंजूर रेखाकंनातून रु.२०-२५ कोटी बेटरमेन्ट चार्जेसचे जमा झाले. तेथील विकास कामाचे बील त्यातून का दिले जात नाही?

श्री.राजू शिंदे :१००, १५०, २०० चे पाईप मनपाने खरेदी करावे. समांतरकडे पाईप होते ते कुठे युज केले? त्याची माहिती घ्यावी तसेच पाणीपुरवठ्याच्या देखभाल दुरूस्तीचे जे साहित्य लागते ते ताबडतोब खरेदी करावे.

मा.महापौर :उपआयुक्त महसूल उपस्थित नाहीत. इतर जे अधिकारी महापौरांच्या परवानगी शिवाय गेलेले आहेत. त्यांना कारणे दाखवा नोटीस द्यावी. जे जे आदेश सभेत दिले जाते, केले जाते ते दोन दिवसात टिप्पणी सचिव यांनी तयार करावी. प्रशासनाकडे सादर करावी. किमान मेन्टनन्ससाठी १ कोटी रूपयाचे १००,१५०, २०० डायमीटरचे पाईप महापालिकेने खरेदी करावे. मनपाच्या स्टोअर मध्ये ठेवा. कंपनीचे जे रेट असेल त्याप्रमाणे काम करावे.

श्री.त्र्यंबक तुपे :पाण्याची समस्या मोठी असून टेंडर २-४ वेळेस झाले. त्यामूळे वेळ लागतो ठेकेदार टेंडर भरत नाहीत. त्यासाठी मनपाने पाईप पुरवीले पाहिजे. इतर लेबर चार्जेस वर काम करून घ्यावे. सौज्यन्यनगर भागातील टेंडर १० वेळेस झाले तीन वार्डासाठी काम होणार आहे. टेंडर घेत नाही. टेक्नीकल बाबी असेल ते महापालिकेने कराव्यात. समांतरकडील पाईप कुठे वापरले?

मा.महापौर :समांतरकडील पाईप बाबत ऑडीट करण्याचे सांगितले होते.

श्री.त्र्यंबक तुपे :महापालिकेने पाईप खरेदी केले. तर दर कमी होतील. जे जे अंदाजपत्रक आहेत. एकत्रित करून लेबर चार्जेस फक्त ठेकेदाराला द्यावेत. पाण्याच्या समस्या सुटतील.

श्री.विकास जैन :जे अंदाजपत्रक मंजूर आहे ते बदलण्याची गरज नाही. शेड्युल मध्ये ॲड करायचे की, पाईप मनपा देणार आहे. टेंडर काढतांना सर्व खर्च क्लब करून निविदा काढावी व मटेरियल महापालिका पुरविणार असे त्यात असावे.

कार्य.अभियंता :अशा प्रकारे काम करण्यास हरकत नाही. परंतु ना-नेटवर्क एरीयामध्ये पाईपचे जास्तीचे काम असेल तेथे योग्य निर्णय घ्यावा लागेल.

श्री.त्र्यंबक तुपे :टेंडर मंजूर आहे परंतु, ठेकेदार काम करीत नसेल अशा ही कामासाठी मनपाने पाईप खरेदी करावे व ते कामाचे वेळी पुरविण्यात यावे.

श्री.विजय औताडे :ज्या संचिका वर्क ऑर्डरला आहे त्या सोडून यानंतरचे कामासाठी पाईप घ्यावे.

मा.महापौर :या नंतर जे टेंडर करायचे त्यासाठी पाईप खरेदी करावे. ज्या वार्डातील कामे ठेकेदार करण्यास तयार नाही. त्या कामाचे लेबर रेट वेगळे व पाईपचे रेट वेगळे काढावे. त्यानुसार कामे करावी. रु.१ कोटीचे पाईप खरेदीसाठी निविदा काढावी.

श्रीमती ज्योती नाडे :पाणीपुरवठ्याच्या संचिका मंजूर आहे. वाटाघाटीसाठी थांबल्या.

श्रीमती सीमा चक्रनारायण:माझे वार्डात पाण्याची लाईनसाठी चार पाईप टाकायचे आहे काम थांबले आहे.

कार्य.अभियंता :पाईप दिलेले आहे. परंतु ती संचिका मंजूर नाही.

श्रीमती मिना गायके :देखभाल दुरूस्तीची दोन कामे होती का होत नाही?

उपअभियंता-श्री.फालक :गल्ली नं.४ व ९ मधील दोन कामे आहेत. रि-टेंडर केले आहे. ठेकेदाराने काम घेतले नाही.

श्रीमती सीमा खरात :वर्षात ४८ दिवस पाणी येते. पुर्ण वर्षाची पाणीपट्टी घेतो. नागरीकांना मुलभूत सुविधा दिल्या पाहिजे. पाणी सोडण्यास गॅप असेल तर एक दिवस अगोदर कल्पना न देता वेळेवर सांगीतले जाते. वार्डात पाणी, लाईट व ड्रेनेज व रस्त्याचा प्रश्न मोठा आहे. पाणीपुरवठ्याच्या व इतर देखभाल दुरूस्तीच्या कामाच्या संचिका मंजूर कराव्यात. अधिकारी हे प्राधान्याने घेत नाही.

श्रीमती सुरेखा सानप :फुलेनगर भागात पाण्याची टंचाई, दुषीत पाणी येते. श्री.पदमे यांचा फोन बंद असतो. वार्डातील टाकी खराब झाली. केंव्हाही पडू शकते.

श्रीमती शोभा वळसे :दत्तनगर, बी व एच सेक्टर मध्ये पाणी येत नाही.

श्री.सचिन खैरे :नवरात्री महोत्सात गुलमंडी, राजाबाजार भागात ८ दिवस पाणी दिले नाही.

श्री.प्रमोद राठोड :पाण्याचा प्रश्न मोठा आहे. मा.आयुक्त येथे नाही. ही सभा तहकूब करावी.

उपमहापौर :पाणीपुरवठा व उत्पन्न वाढीसाठी विशेष सभा आयोजित करावी.

मा.महापौर :विशेष सभा आयोजित केली जाईल. आता विषय घेण्यात येते. शासनाकडील विविध प्रकल्पासाठी आलेले अनुदान व झालेला खर्च याचा बुकलेट तयार करून सदस्यांना द्यावे. संबंधीत अधिकारी श्री.भोंबे व लेखा विभागाने माहिति द्यावी.

श्री.भगवान घडमोडे :कचऱ्याचा प्रश्न आहे तसाच आहे. कुठे काय काम होत आहे? सर्व माहिती घ्यावी.

श्री.त्र्यंबक तुपे :उत्पन्न वाढी बाबतची सभा घ्यावी. शॉपींग मॉल असेल जे जे उत्पन्नाची साधने आहेत त्यातून किती उत्पन्न येते? याची सर्व माहितीसह व सर्व अधिकारी त्या सभेला उपस्थित असतील. असे आदेशीत करावे.

मा.महापौर :मनपास ज्या ज्या माध्यमातून उत्पन्न येते. त्याची माहिती प्रत्येक विभागाने त्या सभेच्या वेळी ठेवावी.

**विषय क्रमांक ६८४:-** **(कार्यकारी अभियंता-ड्रेनेज विभाग)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

**अहवाल:-**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद, प्रस्ताव सादर करित आहेत, देशातील सर्व शहरे हागंदारी मुक्त करुन शहरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान (नागरी) दिनांक ०२ ऑक्टोबर २०१४ पासुन राबविण्यास सुरुवात केली आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी सुरु केली आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये अंतर्गत जे नागरिक उघड्यावर शौचास जाण्याची पध्दत वापरतात व ज्या नागरिकांकडे वैयक्तिक शौचालय नाही फक्त अशाच नागरिकांना सदर योजनेतुन वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामासाठी शासनामार्फत रु.१२०००/- प्रति शौचालय एवढे अनुदान उपलब्ध करुन

देण्यात येणार आहे. सदर अनुदानामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा रक्कम रु.४०००/- व राज्य शासनाचा हिस्सा रु.८०००/- इतका आहे. या संदर्भाने सदरील अभियानाअंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे कार्यवाही करण्यात येत असून आतापर्यंत झालेल्या कामाचा प्रगती अहवाल खालीलप्रमाणे आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी अनुदानास पात्र लाभार्थ्याची निवड करण्याची कार्यवाही सुरु असून आज पर्यत **७४९७** लाभार्थ्याची निवड करण्यात आलेली आहे. त्यापैकी सुमारे **७२६३** लाभार्थ्यास अनुदानाचा पहिला हप्ता रक्कम रु.६०००/- प्रति लाभार्थी इतका त्यांच्या बॅकेच्या खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करण्यात आलेला आहे. उर्वरीत **२३४** पात्र लाभार्थी यांना पहिल्या हफ्त्याची रक्क्म RTGS करणेची कार्यवाही सुरु आहे. आतापर्यत लाभार्थ्यास पहिल्या हप्त्याच्या अनुदाना पोटी एकुण रक्कम रु. **४,३५,७८,०००/-** इतकी वितरीत करण्यात आलेली आहे.

तसेच या व्यतिरीक्त क्रेडाई औरंगाबाद या बांधकाम व्यावसायिक संस्थेस वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम करण्याचे काम देण्यात आलेले असून आतापर्यत त्यांचे बँकेत खात्यावर एकूण **१२९३** लाभार्थ्याचे पहिल्या हप्त्याचे अनुदान रु.६०००/- प्रति लाभार्थी प्रमाणे एकुण र.रु.**७७,५८,०००/-** इतके RTGS करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तसेच आतापर्यत वैयक्तीक शौचालयाच्या बांधकामासाठी अनुदानाचा पहिला हप्ता (वैयक्तीक लाभार्थी व क्रेडाई संस्था मिळून) एकुण ८५५६ इतक्या लाभार्थी संख्येस RTGS करण्यात आले असून एकुण पहिल्या हप्त्याचे अनुदाना पोटी र.रु.५,१३,३६,०००/- इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

तसेच आजपर्यत एकुण **६४९६** लाभार्थ्यानी शौचालय बांधकाम पूर्ण केलेले असून **१०५२** लाभार्थ्याचे शौचालयाचे बांधकाम सुरु आहे तसेच **१००८** लाभार्थ्यामार्फत शौचालयाचे बांधकाम सुरु करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. बांधकाम पूर्ण केलेल्या **४७५९** लाभार्थ्यास अनुदानाचा दुसरा हप्ता रक्कम रु.६०००/- प्रति लाभार्थी इतका त्यांच्या बॅकेच्या खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करण्यात आलेला आहे. आतापर्यत एकुण **४७५९** लाभार्थ्यास दुस-या हप्त्याच्या अनुदाना पोटी एकुण रक्कम रु. **२,८५,५४,००० /-** इतकी वितरीत करण्यात आलेली आहे. पहिल्या व दुस-या हप्त्याच्या अनुदाना पोटी एकूण रक्कम रु.**७,९८,९०,०००/-** इतकी वितरीत करण्यात आलेली आहे.

आजपर्यत एकूण **९३०६** लाभार्थ्यांचे फॉर्म तसेच शौचालय बांधकाम पूर्ण झालेल्या **६४९६** लाभार्थ्या पैकी **६११०** लाभार्थ्याच्या शौचालय बांधकामाचे फोटो शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलेले आहेत. उर्वरित लाभार्थ्याच्या शौचालय बांधकामाचे फोटो व फॉर्म अपलोड करण्याची कार्यवाही सुरु आहे.

व्यतिरिक्त स्वच्छ महाराष्ट्र अभियानअंतर्गत उपलब्ध निधीतून वार्ड क्र-९० येथील राजनगर (मुकूंदवाडी) येथे १० बैठकीचे सामुदायिक शौचालय बांधण्यात आलेले असून त्यामध्ये पुरुष व स्त्रीयांसाठी प्रत्येकी ०५ बैठकी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या शौचालयावर रु.१३.८२ ऐवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे.

| | **जनगणना सन २०११- नुसार शौचालय बांधकाम करावयाचे उद्दिष्ट** | | **वार्ड कार्यालय** | | | | | | | **११९९७** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ क्र** | **तपशिल** | **झोन-१ अ** | **झोन-२ क** | **झोन-३ एन- ६** | **झोन-४ एन-११** | **झोन -५ ब** | **झोन-६ ई** | **झोन-७ फ** | **झोन -८ सातार** | **झोन-९ ड** | **एकुण** |
| अ | १ | वार्ड अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या | २६३७ | २९० | १८९ | ७१४ | ४०३२ | ६८२१ | ७५१ | ५३०४ | ८०० | *२१५३८* |
| | २ | वार्ड अधिकारी यांच्याकडून तपासणी | २६३७ | २९० | १८९ | ७१४ | ४०३२ | ६८२१ | ७५१ | ५३०४ | ८०० | *२१५३८* |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | झालेल्या अर्जाची संख्या | | | | | | | | | | |
| | ३ | वार्ड अधिकारी यांनी ठरविलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या अर्जाची संख्या | ७१५ | ८२ | ११९ | ६२५ | १६६६ | ३९५९ | १६४ | ९१६ | ५४४ | ८७९० |
| | ४ | वार्ड अधिकारी यांनी ठरविलेल्या एकुण अपात्र लाभार्थी संख्या | १९२२ | २०८ | ७० | ८९ | २३६६ | २८६२ | ५८७ | ४३८८ | २५६ | १२७४८ |
| | | *पहिला हप्ता (वैयक्तीक)* | | | | | | | | | | |
| ब | ५ | RTGS साठी पाठविण्यात आलेल्या लाभार्थ्याची संख्या | ७०२ | ४१ | ४८ | ५९८ | १३५६ | ३४५८ | १३६ | ६२७ | ५३१ | ७४९७ |
| | ६ | RTGS झालेल्या लाभार्थ्याची संख्या | ६७९ | ४० | ४७ | ५५१ | १२९४ | ३४१८ | १३२ | ६०३ | ४९९ | ७२६३ |
| | ७ | RTGS न झालेल्या लाभार्थ्याची संख्या | २३ | ०१ | ०१ | ४७ | ६२ | ४० | ०४ | २४ | ३२ | २३४ |
| | ८ | RTGS च्या कार्यवाही अंतर्गत असलेली संख्या | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | *पहिला हप्ता (क्रेडाई संस्था)* | | | | | | | | | | |
| क | ९ | क्रेडाई संस्था औरंगाबाद RTGS झालेली संख्या | १३ | ४१ | ७१ | २७ | ३१० | ५०१ | २८ | २८९ | १३ | १२९३ |
| | १० | क्रेडाई संस्था औरंगाबाद RTGS च्या कार्यवाही अंतर्गत असलेली संख्या | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | *एकुण पहिला हप्ता (ब + क, वैयक्तीक व क्रेडाई संस्था)* | | | | | | | | | | |
| ड | ११ | वैयक्तीक व क्रेडाई संस्था एकूण RTGS झालेली संख्या | ६९२ | ८१ | ११८ | ५७८ | १६०४ | ३९१९ | १६० | ८९२ | ५१२ | ८५५६ |
| | | *दुसरा हप्ता* | | | | | | | | | | |
| ई | १२ | RTGS करिता शिफारस केलेल्या लाभार्थ्यांची संख्या | ४९१ | ३१ | ४९ | १९९ | ८५९ | २२१७ | ६६ | ५२१ | २७१ | ४७०४ |
| | १३ | RTGS झालेल्या लाभार्थ्याची संख्या | ४७३ | ३१ | ४६ | १८७ | ८४५ | २२०१ | ६५ | ५११ | २६५ | ४६२४ |
| | १४ | RTGS न झालेल्या लाभार्थ्याची संख्या | १८ | ०० | ०३ | १२ | १४ | १६ | ०१ | १० | ०६ | ८० |
| | १५ | RTGS च्या कार्यवाही अंतर्गत असलेली संख्या | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | *दुसरा हप्ता (क्रेडाई संस्था)* | | | | | | | | | | |
| फ | १६ | क्रेडाई संस्था औरंगाबाद RTGS झालेली संख्या | ०० | १२ | ०० | ०० | ०० | ९० | ०० | ३३ | ०० | १३५ |
| | १७ | क्रेडाई संस्था औरंगाबाद RTGS च्या कार्यवाही अंतर्गत असलेली संख्या | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | *अनुदान वितरण* | | | | | | | | | | |
| | | एकुण प्राप्त अनुदान | | | | | | ७.८२२१ कोटी | | | | |
| | | पहिला हप्ता | ८५५६ x ६०००/- | | | | | ५.१३३६ कोटी | | | | |
| | | दुसरा हप्ता | ४७५९ x ६०००/- | | | | | २.८५५४ कोटी | | | | |
| | | एकुण | | | | | | ७.९८९० कोटी | | | | |
| | १८ | शौचालय बांधकाम पुर्ण झालेल्या लाभार्थ्याची संख्या (क्रेडाई सह) | - | - | - | - | - | - | - | -- | - | ६४९६ |
| | १९ | शौचालय बांधकाम सुरु असलेली संख्या (क्रेडाई सह) | - | - | - | - | - | - | - | -- | - | १०५२ |
| | २० | शौचालय बांधकाम सुरु न झालेले (क्रेडाई सह) | | | | | | | | | | १००८ |
| | २१ | अपलोड झालेले फॉर्म | - | - | - | - | - | - | - | -- | - | ९२९० |
| | २२ | अपलोड झालेले पब्लीक टॉयलेट | | | | | | | | | | ३१ |
| | २३ | वैयक्तीक शौचालय फोटो अपलोड | - | - | - | - | - | - | - | -- | - | ६११० |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २४ | फोटो अपलोड न झालेले | | | | | | | | | | | ३८६ |

कार्य.अभि.ड्रेनेज :शासनाने सहा महिन्यापासून निधी दिलेला नव्हता म्हणून काम बंद होते. आताच माहिती मिळाली. निधी दिलेला आहे. पुन्हा काम सुरू होईल.

श्री.राजू शिंदे :शासनाचे अनुदान येईपर्यंत मनपाच्या निधीतून शौचालयाचे काम व त्या लाभार्थींना पेमेन्ट करण्याचे आदेशीत केले होते का कार्यवाही केली नाही? माझे वार्डात २६४ शौचालय बांधले. त्यातील ७६ शौचालयाचा दुसरा हप्ता आलेला नाही. ६९ शौचालयाचा पुर्ण हप्ते बाकी आहेत. अनेक शौचालयास भांडे बसविले नाहीत.

कार्य.अभियंता :बजेट मध्ये तरतूद ठेवलेली आहे. आता शासनाकडून पैसे आलेले आहे.

श्री.राजू शिंदे :नागरीक आमच्याकडे तक्रारी घेऊन येतात. तेच ते उत्तर प्रत्येक बैठकीला मिळते. तरतूद करणेसाठी संचिका सादर केली होती का? १३ संचिका शौचालयाच्या सापडत नाही. क्रेडाईने ६४ शौचालय अर्धवट बांधले.

कार्य.अभियंता :१७०० लाभार्थीची यादी तयार आहे. पात्रता ठरविणे हे वार्ड अधिकारी करतात. पात्र लाभार्थीची यादी माझेकडे येते. ती यादी लेखा विभागाकडे पाठवून दिली जाईल. क्रेडाईचे किती पैसे खर्च केले. याचा हिशोब आहे.

श्री.राजू शिंदे :महाराष्ट्र स्वच्छ अभियान राबविणेसाठी अधिकारी यांची मानसिकता नाही. एकच उत्तर अधिकारी देतात. अधिकारी काम करीत नाही म्हणून शासनास तसे कळवावे.

मा.महापौर :मागिल वर्षभरात काय काम केले? या संबंधीची माहिती द्यावी हा विषय स्थगित करण्यात येते. सदस्यांनी नाराजी व्यक्त केली की, या योजनेचे जे अधिकारी काम पाहतात. त्यांचे काम समाधानकारक नाही जो अहवाल असेल शासनास पाठवावा. प्रस्ताव दुरुस्तीसह मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीच्या आढाव्यास तसेच शहर “हागणदारी मुक्त” ODF+ साठी मानांकन व घनकचरा व्यवस्थापनातर्गत शहर स्वच्छते बाबत तीन तारांकना (३ Star) साठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.चेतन कांबळे :दि.११-०९.२०१८ च्या सभेत विषय ६४९ स्थगित होता. मंजूर करावा. रु.१०० कोटीचे शासनाकडून अनुदान आले. त्यातून रु.७.५० कोटी बचत झाले त्यातून एक पुलाचे काम करावे.

मा.महापौर :स्थगित विषय मंजूर. तसेच आजच्या सभेतील विषय ७२२ ते ७२९ महत्वाचे विषय आहेत. तसेच ६९४ मंजूर, लाईनमनचे थकीत पैसे देणे बाबतचा विषय आहे. तसेच ६८६ मंजूर तसेच सदस्यांचे जे विषय आहे. ते दुरूस्तीसह मंजूर.

**विषय क्रमांक ६८५:-** **(उपअभियंता यांत्रिकी)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसाठी एकूण ३२ महानगरपालिकेच्या मालकीची वाहने कार्यरत आहेत, तसेच १७ अधिकारी हे स्वतःचे खाजगी वाहन कार्यालयीन कामासाठी वापरतात त्यापोटी प्रतिपुर्ती रक्कम संबंधित अधिकाऱ्यांना अदा करण्यात येते.

वापरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या वाहनांपैकी १४ वाहनांचे आयुष्यमान १० वर्षापेक्षा अधिक झाल्याने सदरची वाहने लिलाव करणे योग्य आहेत.

मालमत्ता व पाणीपट्टी कर वसुली तसेच घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी वार्ड अधिकारी यांना कार्यालयीन वाहन असणे आवश्यक आहे. करीता एकूण ०९ वार्ड अधिकारी व ०१ सुरक्षा अधिकारी असे एकूण १० अधिकाऱ्यांना १० टाटा सुमो (गोल्ड सी.एक्स) वाहने नविन खरेदी करावी लागणार आहेत. GeM (गव्हर्मेंट ई-मार्केटींग) पोर्टल वरील दरानुसार टाटा सुमो (गोल्ड सी.एक्स.) या वाहनांची किंमत रु ५,६९,१८८/- प्रति वाहन असुन, १० वाहने खरेदी करण्यासाठी रु. ५६,९१,८८०/- खर्च अपेक्षित आहे. वास्तविक खरेदीच्या वेळी कंपनीच्या दरात बदल झाल्यास त्या वेळीच्या दरानुसार रक्कम कंपनीस अदाई करावी लागेल.

महानगरपालिकेमध्ये कार्यरत एकूण ०९ वर्ग-१ अधिकारी (अतिरीक्त आयुक्त-२/उपआयुक्त, महसुल/कार्यकारी अभियंता,पा.पु/कार्यकारी अभियंता-१/आरोग्य वैद्यकिय अधिकारी/ मुख्य लेखाधिकारी/मुख्य लेखापरिक्षक/मुख्यलेखाधिकारी/संचालक प्राणिसंग्रहालय/दक्षता कक्ष प्रमुख) यांचेसाठी मारुती डिझायर व्हीडीआय डिझेल सेडन कार खरेदी करणे योग्य होईल. GeM पोर्टल वरील दरानुसार सदर वाहनाची किंमत रु.६,५६,३५४/- प्रतिवाहन एवढी असुन, ०९ वाहने खरेदी करण्यासाठी रु.५९,०७,१८६/- खर्च अपेक्षीत आहे. वास्तविक खरेदीच्या वेळी कंपनीच्या दरात बदल झाल्यास त्या वेळीच्या दरानुसार रक्कम अदाई करावी लागेल.

महानगरपालिकेमध्ये कार्यरत एकुण ०४ वर्ग-२ अधिकारी (विशेष भूसंपादन अधिकारी/विधी सल्लागार/उदयान अधिक्षक/उपअभियंता यांत्रिकी) यांचेसाठी टाटा बोल्ट एक्स.एम.एस. ही डिझेल कार खरेदी करणे योग्य होईल. GeM पोर्टल वरील दरानुसार सदर वाहनाची किंमत रु.५,५२,८३१/- प्रतिवाहन असुन,०४ वाहने खरेदी करण्यासाठी रु.२२,११,३२४/- खर्च अपेक्षीत आहे. वास्तविक खरेदीच्या वेळी कंपनीच्या दरात बदल झाल्यास त्या वेळीच्या दरानुसार रक्कम अदाई करावी लागेल.

सद्यस्थितीत अधिका-यांकडे कार्यरत असलेल्या वाहने व निर्लेखन करावयाच्या वाहनाचा
**तपशिल खालील प्रमाणे आहे. तक्ता- अ**

| अ.क्र | वाहनाचा प्रकार | मॉडेल वर्ष | वाहन क्रमांक | एकुण संख्या | वापर करीत असलेल्या अधिका-याचे नांव | निर्लेखन लिलाव करावयाचे वाहन क्रमांक | शिल्लक वाहन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मारुती सियाज | २०१५ | MH20/CU-270 | ०१ | शहर अभियंता | निरंक | ०१ शहर अभियंता |
| | | २०१७ | MH20/EJ-3003 | ०१ | आयुक्त | निरंक | ०१-आयुक्त |
| २ | टाटा मांझा | २०११ | MH20/AS-9191 | ०१ | आयुक्त | निरंक | ०१- आयुक्त |
| | | २०११ | MH20/AS-900 | ०१ | अति.आयुक्त-१ | निरंक | ०१-अति. आयुक्त-१ |
| ३ | टाटा इंडिगो | २००४ | MH20/U-9797 | ०१ | कार्यकारी अभियंता (रस्ते) | MH20/U-9797 | निरंक |
| | | २००४ | MH20/U-9898 | ०१ | कार्यकारी अभियंता (पा.पु) | MH20/U-9898 | निरंक |
| | | २००७ | MH20/U-9829 | ०१ | आरोग्य वैद्यकिय अधिकारी | MH20/U-9829 | निरंक |
| ४ | टाटा इंडिका | २००६ | MH20/U-9791 | ०१ | अति.आयुक्त-२ | MH20/U-9791 | निरंक |
| | | २००६ | MH20/U-9792 | ०१ | मुख्यलेखाधिकारी | MH20/U-9792 | निरंक |
| | | २००६ | MH20/U-9793 | ०१ | मुख्य पशुसंवर्धन अधिकारी | MH20/U-9793 | निरंक |
| | | २००६ | MH20/AX-1729 | ०१ | विधी सल्लागार | MH20/AX1729 | निरंक |
| | | २००७ | MH20/U-9802 | ०१ | दक्षता कक्ष प्रमुख | MH20/U-9802 | निरंक |
| | | २००७ | MH20/U9803 | ०१ | उपअभियंता यांत्रिकी | MH20/U-9803 | निरंक |
| | | २००७ | MH20/U-9804 | ०१ | उदयान अधिक्षक | MH20/U-9804 | निरंक |
| | | २००७ | MH20/U-9805 | ०१ | मुख्यलेखापरिक्षक | MH20/U-9805 | निरंक |
| ५ | टोयोटा इनोव्हा | २०१४ | MH20/CU-3300 | ०१ | अग्निशमन विभाग | निरंक | ०१-अग्निशमन विभाग |
| ६ | ॲम्बेसिडर कार | २०१२ | MH20/AS-1516 | ०१ | उपआयुक्त (प्रशासन) | निरंक | ०१ उपआयुक्त (प्रशासन) |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | मारुती-८०० | २००१ | MH20/U-9577 | ०१ | वार्ड अधिकारी-९ | MH20/U-9577 | निरंक |
| | | २००१ | MH20/U-9587 | ०१ | वार्ड अधिकारी-६ | MH20/U-9587 | निरंक |
| ८ | महिंद्रा बोलेरो | २०१२ | MH20/AS-3233 | ०१ | अग्निशमन विभाग | निरंक | ०१-अग्निशमन विभाग |
| | | २०१२ | MH20/AS-1112 | ०१ | सनियंत्रण अधिकारी | निरंक | ०१-संनियंत्रण |
| ९ | महिंद्रा स्कोर्पीयो | २०११ | MH20/AS-9933 | ०१ | मुख्य अग्निशमन | निरंक | ०१-मुख्य अग्निशमन अधिकारी |
| १० | टाटा सुमो | २००० | MH20/U-6444 | ०१ | आरोग्य विभाग | MH20/U-6444 | निरंक |
| | | २००३ | MH20/Y-7097 | ०१ | भुसंपादन अधिकारी | MH20/Y-7097 | निरंक |
| | | २०११ | MH20/AS-1801 | ०१ | उपअभियंता (पापु)जायकवाडी | निरंक | ०१-उपअभियंता (पा.पु जायकवाडी स्थापत्य) |
| | | २०११ | MH20/AS-7839 | ०१ | मनपा पोलीस पथक | निरंक | ०१ मनपा पोलीस पथक |
| | | २०१३ | MH20/AS-7172 | ०१ | उपअभियंता पा.पु जाय.यांत्रिकी | निरंक | ०१ उपअभियंता पा.पु जायकवाडी यांत्रिकी |
| | | २०१३ | MH20/AS-5859 | ०१ | उपअभियंता (विद्युत) | निरंक | ०१ उपअभियंता (विद्युत) |
| | | २०१३ | MH20/AS-5960 | ०१ | संगणक,सुरक्षा,नगर सचिव विभाग | निरंक | ०१ संगणक, सुरक्षा, नगर सचिव विभाग |
| | | २०१३ | MH20/CU-0018 | ०१ | पशुसंवर्धन विभाग | निरंक | ०१ पशुसंवर्धन विभाग |
| ११ | महिंद्रा जीप | १९९३ | MH20/9478 | ०१ | फॉगींग मशिन वाहतुक | निरंक | ०१ फॉगींग मशिन वाहतुक |
| | | १९९६ | MH20/E-2066 | ०१ | फॉगींग मशिन वाहतुक | निरंक | ०१ फॉगींग मशिन वाहतुक |
| | | | एकुण | ३२ | | १५ | १७ |

**पदनाम निहाय अधिका-यांसाठी आवश्यक वाहनांचा तपशिल खालील प्रमाणे आहे. तक्ता -ब**

| अ.क्र | पदनाम | वाहनांची मागणी | उपलब्ध वाहने संख्या | शेरा | खरेदी करावयाची वाहने |
|---|---|---|---|---|---|
| | वर्ग-१ अधिकारी | | | | |
| १ | अतिरिक्त आयुक्त-२ | ०१ कार | 01 कार (MH20/U-9791) | लिलाव अंतर्गत | ०१ कार (स्विप्ट डिझायर) |
| २ | उपआयुक्त (महसुल) | ०१ कार | 01 कार (MH20/AS-1516) | नवीन वाहन देणे योग्य | ०१ कार (स्विप्ट डिझायर) |
| ३ | कार्यकारी अभियंता पा.पु. | ०१ कार | 01 कार (MH20/U-9898) | लिलाव अंतर्गत | ०१ कार (स्विप्ट डिझायर) |
| ४ | कार्यकारी अभियंता-१ | ०१ कार | 01 कार (MH20/U-9797) | लिलाव अंतर्गत | ०१ कार (स्विप्ट डिझायर) |
| ५ | मुख्यलेखापरिक्षक | ०१ कार | 01 कार (MH20/U-9805) | लिलाव अंतर्गत | ०१ कार (स्विप्ट डिझायर) |
| ६ | आरोग्य वैद्यकिय अधिकारी | ०१ कार | 01 कार (MH20/U-9829) | लिलाव अंतर्गत | ०१ कार (स्विप्ट डिझायर) |
| ७ | मुख्यलेखाधिकारी | ०१ कार | 01 कार (MH20/U-9792) | लिलाव अंतर्गत | ०१ कार (स्विप्ट डिझायर) |
| ८ | संचालक प्राणि संग्रहालय | ०१ कार | 01 कार (MH20/U-9793) | लिलाव अंतर्गत | ०१ कार (स्विप्ट डिझायर) |
| ९ | दक्षता कक्ष प्रमुख | ०१ कार | ०१ कार (MH20/U-9802) | लिलाव अंतर्गत | ०१ कार (स्विप्ट डिझायर) |
| | वर्ग-२ अधिकारी- | | | | |
| १० | विशेष भुसंपादन अधिकारी | ०१ कार | 01 जीप (MH20/Y-7097) | लिलाव अंतर्गत | ०१ कार (टाटा बोल्ट) |
| ११ | विधी सल्लागार | ०१ कार | 01 कार (MH20/U-1729) | लिलाव अंतर्गत | ०१ कार (टाटा बोल्ट) |
| १२ | उदयान अधिक्षक | ०१ कार | 01 कार (MH20/U-9804) | लिलाव अंतर्गत | ०१ कार (टाटा बोल्ट) |
| १३ | उपअभियंता यांत्रिकी | ०१ कार | 01 कार | लिलाव अंतर्गत | ०१ कार |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | (MH20/U-9803) | | (टाटा बोल्ट) |
| १४ | वार्ड अधिकारी-१ | ०१ जीप | प्रतिपुर्ती रक्कम घेत आहेत. | नवीन वाहन देणे योग्य | ०१ जीप (टाटा सुमो) |
| १५ | वार्ड अधिकारी-२ | ०१ जीप | प्रतिपुर्ती रक्कम घेत आहेत. | नवीन वाहन देणे योग्य | ०१ जीप (टाटा सुमो) |
| १६ | वार्ड अधिकारी-३ | ०१ जीप | प्रतिपुर्ती रक्कम घेत आहेत. | नवीन वाहन देणे योग्य | ०१ जीप (टाटा सुमो) |
| १७ | वार्ड अधिकारी-४ | ०१ जीप | प्रतिपुर्ती रक्कम घेत आहेत. | नवीन वाहन देणे योग्य | ०१ जीप (टाटा सुमो) |
| १८ | वार्ड अधिकारी-५ | ०१ जीप | प्रतिपुर्ती रक्कम घेत आहेत. | नवीन वाहन देणे योग्य | ०१ जीप (टाटा सुमो) |
| १९ | वार्ड अधिकारी-६ | ०१ जीप | ०१ कार | लिलाव अंतर्गत | ०१ जीप (टाटा सुमो) |
| २० | वार्ड अधिकारी-७ | ०१ जीप | प्रतिपुर्ती रक्कम घेत आहेत. | नवीन वाहन देणे योग्य | ०१ जीप (टाटा सुमो) |
| २१ | वार्ड अधिकारी-८ | ०१ जीप | ०१ जीप किरायाचे वाहन | नवीन वाहन देणे योग्य | ०१ जीप (टाटा सुमो) |
| २२ | वार्ड अधिकारी-९ | ०१ जीप | ०१ कार | लिलाव अंतर्गत | ०१ जीप (टाटा सुमो) |
| २३ | सुरक्षा अधिकारी | ०१ जीप | ०१ जीप | सचिव,संगणक कक्ष प्रमुख व सुरक्षा अधिकारी एकत्रित वाहन वापरतात करीता सुरक्षा अधिकारी यांना स्वतंत्र वाहन देणे योग्य | ०१ जीप (टाटा सुमो) |

वरील व्यतिरिक्त अजुन १७ वाहने मनपा कडे असुन, पैकी १३ वाहनांसंदर्भात आरटीओ कार्यालयाकडुन वाहन स्क्रॅप करणे संदर्भात अहवाल प्राप्त असुन या संदर्भात सदर प्रकरणी मान्यता होवुन वाहन नोंदणी रदद होणेस्तव स्वतंत्र संचिका प्रस्तावित आहे. तरी इतर ०४ वाहनांपैकी ०२ वाहने टाटा हेक्झा हे सन २०१८ मध्येच मा. महापौर व उपमहापौर यांचेसाठी नव्याने खरेदी करण्यात आलेले आहे. आरोग्य विभागा मार्फत नवीन रुग्णवाहिका खरेदी संदर्भात प्रस्ताव असुन या साठी नवीन रुग्णवाहिका खरेदी करीत असतांना सद्यस्थितीत कार्यरत टाटा सुमो (रुग्णवाहिका एम.एच.२०/यु-९५६७) निर्लेखनासाठी प्रस्तावित करण्यात येईल, व मनपाकडे उपलब्ध असलेले एकमेव टाटा सफारी एम.एच.२०/बीबी-३३३३ सद्यस्थितीत अग्निशमन विभागाकडे आहे. व या वाहना ऐवजी इतर कोणतेही वाहन खरेदीसाठी प्रस्तावित नसल्याने उपरोक्त तक्ता-अ यादीत समाविष्ठ नाही.

तक्ता-अ मध्ये दर्शविल्यानुसार निर्लेखीत/लिलाव करावयाच्या एकुण १५ वाहनांपैकी एक वाहन (अ.क्र १० मधील वाहन क्रमांक एम.एच.२०/यु-६४४४) हे क्षयरोग नियंत्रण समितीसाठी शासनाकडुन उपलब्ध झालेले असल्याने या वाहना ऐवजी नवीन वाहन खरेदीसाठी प्रस्तावित करण्यात आलेले नाही. तसेच वार्ड अधिकारी ०६ व ०९ यांचेसाठी नव्याने खरेदी करावयाच्या वाहनांची नोंद सर्व वार्ड अधिका-यांना खरेदी करावयाच्या वाहनांच्या संख्येत झालेली असल्याने त्यामुळे उर्वरीत १२ वाहने आणि वार्ड अधिका-यांसाठी ०९ वाहने, उपआयुक्त (महसुल) यांचेसाठी ०१ वाहन आणि सुरक्षा अधिकारी यांचेसाठी ०१ वाहन असे एकुण २३ वाहने आवश्यक आहेत. यामध्ये वार्ड अधिका-यांसाठी ०९ वाहने नव्याने खरेदी करण्यात येणार असल्याने सद्यस्थितीत वार्ड अधिका-यांना देण्यात येणारी वाहने प्रतिपुर्तीची सवलत बंद करण्यात येईल.

वरील प्रमाणे महानगरपालिका अधिका-यांसाठी नवीन २३ वाहने GeM पोर्टलवरुन खरेदी करण्यासाठी एकुण रु.१,३८,१०,३९०/-खर्च अपेक्षीत आहे. वास्तविक खरेदीच्या वेळी कंपनीच्या दरात बदल झाल्यास खर्चात वाढ अथवा घट होऊ शकते. तसेच वाहनांचे आरटीओ फिटनेस पासिंग व विमा करण्यासाठी वेगळा खर्च करावा लागणार आहे.

करीता वाहन खरेदीसाठी लागणारा खर्च रु.१,३८,१०,३९०/- ची तरतुद उपलब्ध करुन देण्यासह खरेदी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्तुत प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ६८६:-** **(कार्यकारी अभियंता ४ ते ७ विद्युत/स्लम)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी.चिकलठाणा अंतर्गत शक्ती टाईल्स व सम्राट टाईल्स समोरील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१७-२०१८ च्या दरसुची नुसार रक्कम रु.९९,९६,९९७/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम मनपा अर्थसंकल्प सन २०१८-२०१९ मधील लेखाशिर्ष मुलभूत सोई-सुविधा अंतर्गत अनुदानातून प्रस्तावीत आहे. सदरील कामास दिनांक ०६.०८.२०१८ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे.

करीता, अंदाजपत्रक रक्कम रु.९९,९६,९९७/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी.चिकलठाणा अंतर्गत शक्ती टाईल्स व सम्राट टाईल्स समोरील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाच्या रक्कम रु.९९,९६,९९७/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६८७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे गारखेडा न.भु.क्र.१५७३५/३१ येथे आरक्षण क्रमांक २६६/बी गार्डन असून मिळकतधारक यांनी या जागेबाबत संबंधीत मिळकतधारकाने महराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-१२७ अन्वये खरेदी सुचना दिनांक ०३.११.२०१४ रोजी दिलेली आहे. त्यानुषंगाने भुसंपादन कार्यवाही करणे अनिवार्य असल्याने विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्याकडे मिळकतधारक श्री.योगेशकुमार विठ्ठलदास झवेरी यांच्या क्षेत्रफळ २२४८.१७ चौ.मी. जागेचा भुसंपादन प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

दरम्यान उक्त प्रकरणी मिळकतधारक यांनी रिट पिटीशन क्र.३५३३/२०१७ अन्वये मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेली आहे. सदर याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.१४.०३.२०१८ रोजी एक वर्षाच्या आत मोबदला देण्याचा आदेश पारीत केला आहे.

करीता विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांना इकडील कार्यालयाने भुसंपादन कार्यवाही विहीत मुदतीत करणे बाबत कळविण्यात आले असता, त्यांनी उक्त जागेचे भुसंपादन करण्यासाठी अंदाजे मावेजा र.रु.९,२९,३९,३४८/- आवश्यक असल्याचे कळविले आहे व त्यापैकी ३०% म्हणजेच र.रु.२,७८,८१,८०४/- त्वरित त्यांच्या कार्यालयात जमा करणे बाबत कळविले आहे. सदरील रक्कम जमा झाल्यावर नंतर प्रकरणी भुसंपादना बाबत कार्यवाही होईल.

करीता, भुसंपादन पोटी र.रु.९,२९,३९,३४८/- विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक औरंगाबाद यांच्याकडे भुसंपादनापोटी अदा करणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्तुत प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ६८८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६१ मध्ये सर्वे नंबर ३५ जसवंतपुरा येथे मनपा मालकीची जागा आहे या ठिकाणी सन १९८० मध्ये लहान आरोग्य केंद्र बांधण्यात आलेले होते. परंतु सदरील इमारत मोडकळीस आल्याने व इमारत जर्जर झाल्याने त्या शेजारी NURHM अंतर्गत आरोग्य केंद्र बांधण्यात आलेले आहे.

करिता, मनपाचे जुने लहान आरोग्य केंद्र धोकादायक झाल्याने सदर इमारत पाडण्याची परवानगी मिळण्यास तथा सदरील जागेवर पार्किंग किंवा केंद्रासाठी मोकळी जागा उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी

**अनुमोदक:-**श्री.कादरी जमीर अहेमद रहिम अहेमद

मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६१, सर्वे नंबर-३५, जसवंतपुरा येथे असलेले मनपाचे जुने लहान आरोग्य केंद्र धोकादायक झाल्याने सदर इमारत पाडून त्या जागेवर नियमाप्रमाणे पार्किंग किंवा केंद्रासाठी मोकळी जागा उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६८९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक ०९.०२.२०१८ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र.२६५ अन्वये खालील कामासाठी तरतुद वळती करण्यात आली होती. नागरीकांच्या सोईसाठी खालील कामे करणे आवश्यक असून त्यासाठी लेखाशिर्ष बदलून तरतुद उपलब्ध होणे आवश्यक आहे.

तरी, खालील कामाचे लेखाशिर्ष बदलुन वळती करणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र./पा.क्र. | जुन्या कामाचे नांव | नविन कामाचे नाव | अ.प.रक्कम |
|---|---|---|---|
| Zone No.01-Spill P.No.22, Sr.No.3 | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत भडकलगेट येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील संपूर्ण चौकात व्हाईट टॉपींग करणे.<br>आर्थिक तरतुद रु.२०.०० लक्ष | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील समाज मंदिराचे नुतनीकरण करणे. | २०.०० लक्ष |

**सुचक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे **अनुमोदक:-**श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९ अंतर्गत खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र./पा.क्र. | जुन्या कामाचे नांव | नविन कामाचे नाव | अ.प.रक्कम |
|---|---|---|---|
| Zone No.01-Spill P.No.22, Sr.No.3 | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत भडकलगेट येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील संपूर्ण चौकात व्हाईट टॉपींग करणे.<br>आर्थिक तरतुद रु.२०.०० लक्ष | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील समाज मंदिराचे नुतनीकरण करणे. | २०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६९०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक १९.०३.२०१८ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र.३६८ अन्वये खालील कामासाठी तरतुद वळती करण्यात आली होती. नागरीकांच्या सोईसाठी खालील काम करणे आवश्यक असून त्यासाठी लेखाशिर्ष बदलून तरतुद उपलब्ध होणे आवश्यक आहे.

तरी, खालील कामाचे लेखाशिर्ष बदलुन वळती करणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र./पा.क्र. | जुन्या कामाचे नांव | नविन कामाचे नाव | अ.प.र.रु. |
|---|---|---|---|
| Zone No.01- Spill P.No.22, Sr.No.3 | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत विविध ठिकाणी चौकात हायमास्ट बसविणे व पोलसह विद्युत व्यवस्था करणे. आर्थिक तरतुद रु.२५.०० लक्ष | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत विविध विकास कामे करणे. | २५.०० लक्ष |

**सुचक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे **अनुमोदक:-**श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९ अंतर्गत खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र./पा.क्र. | जुन्या कामाचे नांव | नविन कामाचे नाव | अ.प.र.रु. |
|---|---|---|---|
| Zone No.01- Spill P.No.22, Sr.No.3 | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत विविध ठिकाणी चौकात हायमास्ट बसविणे व पोलसह विद्युत व्यवस्था करणे. आर्थिक तरतुद रु.२५.०० लक्ष | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत विविध विकास कामे करणे. | २५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६९१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१८-२०१९ मध्ये मा.स्थायी समितीने शिफारस केलेली झोन अभियंता कार्यालय-५ अंतर्गत नविन विकास कामांच्या यादी मधील प्रभाग क्र.३७ मध्ये विविध भागात डांबरीकरण करणे, रु.१० लक्ष हे काम वळती करून त्याऐवजी प्रभाग क्र.३७ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे, रु.१० लक्ष असे लेखाशिर्ष बदलाबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती वैशाली कारभारी जाधव **अनुमोदक:-**श्री.सोहेल शकील शेख

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन अभियंता कार्यालय-५ अंतर्गत नविन विकास कामांच्या यादी मधील प्रभाग क्र.३७ मध्ये विविध भागात डांबरीकरण करणे, रु.१० लक्ष या कामाऐवजी प्रभाग क्र.३७ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे करीता रु.१० लक्ष वळती करण्यास व लेखाशिर्ष बदलास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६९२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात सध्या तरुण वर्ग मोबाईल गेम खेळण्यात व्यस्थ झालेला आहे. मैदानी खेळापासून तरुण वर्ग दुर होत असल्याने त्यांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. तरुण वर्गामध्ये मैदानी खेळाची आवड निर्माण करण्यासाठी फुटबॉल स्पर्धा आयोजीत करणे आवश्यक आहे.

करिता, औरंगाबाद शहरात मराठवाड्यातील नामांकीत फुटबॉल संघांना आमंत्रित करून मा.महापौर चषक फुटबॉल स्पर्धा भव्य स्वरुपात घेण्यासाठी अंदाजे रु.२५ लाख संभावित खर्चास मंजुरी तसेच मा.महापौर चषक मराठवाडा स्तरीय फुटबॉल स्पर्धा आयोजन करण्याकरीता मंजुरी मिळण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कादरी जमीर अहेमद रहिम अहेमद **अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात महानगरपालिकेच्या वतीने महापौर चषक, मराठवाडा स्तरीय फुटबॉल स्पर्धा आयोजन करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच सदर स्पर्धा आयोजनासाठी नियमानुसार लागणाऱ्या संभावित खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६९३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६१ मध्ये सर्वे नं.३५, जसवंतपुरा येथे महानगरपालिकेच्या कम्युनिटी सेंटर व शॉपिंग सेंटरसाठी जागा आरक्षित असुन सदरील जागा अनेक वर्षापासून पडीक आहे. या वॉर्डात गोर-गरीब व मोलमजुरी करणारे रहिवासीयांची संख्या जास्त प्रमाणात असून त्यांना त्यांचे सामाजिक व पारिवारीक सणवार साजरे करण्यासाठी कोणताही हॉल नसल्याने त्यांचे कार्यक्रम त्यांना रस्त्यावर साजरे करावे लागतात. ज्यामुळे वाहतुकीस तथा रहदारीस नेहमी त्रास होत असतो.

सदरील आरक्षीत जागेवर भव्य सामाजिक सभागृह बांधण्यासाठी मा.आमदार श्री.सय्यद इम्तियाज जलील साहेबांनी रु.२ कोटीचा निधी उपलब्ध करून देणार असल्याचे त्याबाबतचे त्यांनी मा.महापौर महोदय तथा मा.आयुक्त महोदयांना दिनांक ३० ऑगस्ट-२०१८ रोजी पत्र सुध्दा दिलेले आहे.

करीता, वॉर्ड क्र.६१ मधील सर्वे नं.३५ मध्ये कम्युनिटी सेंटर व शॉपींग सेंटरसाठी आरक्षित असलेल्या जागेमध्ये सामाजिक सभागृह मा.आमदार महोदयांच्या निधीतून बांधण्यासाठी मंजुरी मिळण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे
मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६१, सर्वे नं.३५ मध्ये कम्युनिटी सेंटर व शॉपींग सेंटरसाठी आरक्षित असलेल्या जागेवर नियमाप्रमाणे मा.आमदार श्री.सय्यद इम्तियाज जलील महोदयांच्या निधीतून सामाजिक सभागृह बांधण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६९४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी. चिकलठाणा या प्रभागातील कामासाठी असलेल्या अर्थसंकल्पातील तरतुद खालील दर्शविल्या प्रमाणे वळती करण्यात यावे करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| **अर्थसंकल्प पान नं. व अ.क्र.** | **कामाचे नाव** | **सुधारीत कामाचे नाव** |
|---|---|---|
| नाला ट्रेनिंग कामे एस.सी.आर. झोन क्र.०५, पान नं.२२ अ.क्र. ३ | वॉर्ड क्र.३८, अशोकनगर, मसनतपुर येथे नाल्या काठची संरक्षण भिंत बांधणे. र.रु.५०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.३८ अंतर्गत एन-१ सिडको येथे विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.५०.०० लक्ष. |

**सुचकः-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदकः-**श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके

श्री.राजु शिंदे :सुधारित कामामध्ये बदल करून हा विषय मंजुर करावा.

मा.महापौर :विषय दुरूस्तीसह मंजुर.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी. चिकलठाणा येथे खालील कामाचे लेखाशिर्ष बदलास मंजुरी देण्यात येते.

| **अर्थसंकल्प पान नं. व अ.क्र.** | **कामाचे नाव** | **सुधारीत कामाचे नाव** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| नाला ट्रेनिंग कामे एस.सी.आर.झोन क्र.०५, पान नं.२२ अ.क्र. ३ | वॉर्ड क्र.३८, अशोकनगर, मसनतपुर येथे नाल्या काठची संरक्षण भिंत बांधणे. र.रु.५०.०० लक्ष. | १. वॉर्ड क्र.३८ अंतर्गत अशोकनगर, मसनतपुर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. रु.१० लक्ष.<br>२. वॉर्ड क्र.३८ अंतर्गत मसनतपुर येथे पाण्याची पाईप लाईन टाकणे. रु.१५ लक्ष.<br>३. वॉर्ड क्र.३८ मसनतपुर मनपाच्या शाळे समोरील कंपाऊंड वॉलला गेट बसवून इतर कामे करणे.रु.५ लक्ष.<br>४. वॉर्ड क्र.३८ मसनतपुर मनपाच्या शाळेत नवीन बांधण्यात आलेल्या खोल्यांमध्ये नवीन लाईट फिटींग करणे. रु.४ लक्ष.<br>५. वॉर्ड क्र.३८ अंतर्गत विविध ठिकाणी विविध विकास कामे करणे. रु.१६ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६९५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२१, बुढ्ढीलैन-कबाडीपुरा या वॉर्डात शाह जमाल बाबा दर्ग्याजवळील मनपाच्या व्यापारी संकुलात औरंगाबाद महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र असून सदरील आरोग्य केंद्रास आजपर्यंत कोणतेच नाव देण्यात आलेले नाही.

करिता, माझ्या वॉर्डातील जेष्ठ नागरीक तथा माजी नगरसेवक श्री.इकबाल मुजाहेद यांच्या मातोश्री “स्व.अकबरी बेगम सय्यद मोहम्मद खुतुबोद्दीन” ह्यांचे नाव मनपा कबाडीपुरा आरोग्य केंद्रास देण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती परवीन खैसर खान

**अनुमोदक:-**श्री.कादरी जमीर अहेमद रहिम अहेमद,श्री.नासेर सिद्दीकी तकीउद्दीन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२१, बुढ्ढीलैन-कबाडीपुरा मधील शाह जमाल बाबा दर्ग्याजवळील मनपाच्या व्यापारी संकुलात असलेल्या महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रास याच वॉर्डातील जेष्ठ नागरीक तथा माजी नगरसेवक श्री.इकबाल मुजाहेद यांच्या मातोश्री “स्व.अकबरी बेगम सय्यद मोहम्मद खुतुबोद्दीन” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६९६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-०१, हर्सुल परिसरातील हर्सुल गाव ते जकातनाका पर्यंतच्या रस्त्यास “श्री संत शिरोमणी नरहरी महाराज मार्ग” असे नाव देण्यात यावे. अशी या परिसरातील नागरीकांची मागणी आहे. श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांचे कार्य विचारात घेता गजानन महाराज मंदिर ते जकातनाका पर्यंतच्या रस्त्यास “श्री संत शिरोमणी नरहरी महाराज मार्ग” असे नाव देण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.पुनमचंद सोनाजी बमणे **अनुमोदक:-**श्री.विजय साईनाथ औताडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-०१, हर्सुल परिसरातील गजानन महाराज मंदिर ते जकातनाका पर्यंतच्या रस्त्यास “श्री संत शिरोमणी नरहरी महाराज मार्ग” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६९७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५० अंतर्गत नागरीकांच्या सोईसाठी पोलीस हेड क्वॉर्टरच्या बाजूच्या कॉलनीला तसेच बसस्टॅण्ड ते मिलकॉर्नर या भागाला कोणतेही नाव नसल्याने परिसरातील नागरीकांची पत्र व्यवहार करतांना गैरसोय होत असून सदरील कॉलनीला नाव देणे बाबत परिसरातील नागरीक वारंवार मागणी करीत आहे.

करीता, खालील प्रमाणे नाव देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

१. पोलिस हेड क्वॉर्टर डावी बाजूची कॉलनी - सय्यद हमीद अली कॉलनी
२. मुख्य बसस्थानक ते मिलकॉर्नर रस्ता - समद यार खान रस्ता

**सुचक:-**श्रीमती नसरीन बेगम समद यार खान **अनुमोदक:-**श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफिक पठाण
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५० अंतर्गत पोलीस हेड क्वॉर्टरच्या बाजूच्या कॉलनीला तसेच बसस्टॅण्ड ते मिलकॉर्नर या भागाला खालील प्रमाणे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते.

१. पोलिस हेड क्वॉर्टर डावी बाजूची कॉलनी - सय्यद हमीद अली कॉलनी
२. मुख्य बसस्थानक ते मिलकॉर्नर रस्ता - समद यार खान रस्ता

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६९८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३६, नारेगाव-ब्रिजवाडी अंतर्गत पावरलूम, कैसर कॉलनी हा भाग अल्पसंख्यांक बहुल भाग असून या भागात विविध विकास कामे करणे अत्यंत गरजेचे आहे. ती विकास कामे खालील प्रमाणे.

| अ.क्र. | विकास कामांचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | पावरलुम येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२० लक्ष |
| २. | पावरलुम येथील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.२० लक्ष |
| ३. | पावरलुम येथे विविध विकास कामे करणे. | रु.१० लक्ष |
| ४. | कैसर कॉलनी येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२० लक्ष |
| ५. | कैसर कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.२० लक्ष |
| ६. | कैसर कॉलनी येथे विविध विकास कामे करणे. | रु.१० लक्ष |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-**श्री.पवार आत्माराम माणिकराव
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३६, नारेगाव-ब्रिजवाडी अंतर्गत असलेल्या पावरलूम, कैसर कॉलनी या अल्पसंख्यांक बहुल भागात खालील प्रमाणे विविध विकास कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामांचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | पावरलुम येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२० लक्ष |
| २. | पावरलुम येथील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.२० लक्ष |
| ३. | पावरलुम येथे विविध विकास कामे करणे. | रु.१० लक्ष |
| ४. | कैसर कॉलनी येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२० लक्ष |
| ५. | कैसर कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.२० लक्ष |
| ६. | कैसर कॉलनी येथे विविध विकास कामे करणे. | रु.१० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६९९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३४ मधील मनपा अर्थसंकल्प सन २०१८-२०१९ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. व पान क्र. | सन २०१८-१९ मधील कामाचे नाव | नविन लेखाशिर्षासाठी वळती करणे |
|---|---|---|
| SCR-ZONE-5-P.N.21 अ.क्र.०३ | वॉर्ड क्र.३४, आरतीनगर अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे. आर्थिक तरतुद र.रु.२० लक्ष | वॉर्ड क्र.३४ अंतर्गत नविन सिमेंट कॉंक्रिट रस्ता तयार करणे. या कामासाठी र.रु.२० लक्ष वळती करण्यात यावी. |
| SCR-ZONE-5-P.N.18 अ.क्र.०२ | वॉर्ड क्र.३४ अंतर्गत अण्णाभाऊ साठे सभागृह बांधणे. आर्थिक तरतुद र.रु.१५ लक्ष | वॉर्ड क्र.३४ मध्ये व्यायाम शाळेकरीता विविध नविन साहित्य खरेदी करणे. या कामासाठी र.रु.१५ लक्ष वळती करण्यात यावी. |

**सुचक:-**श्रीमती संगीता सुभाष वाघुले **अनुमोदक:-** श्री.कादरी जमीर अहेमद रहिम अहेमद
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३४ येथे खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. व पान क्र. | सन २०१८-१९ मधील कामाचे नाव | नविन लेखाशिर्षासाठी वळती करणे |
|---|---|---|
| SCR-ZONE-5-P.N.21 अ.क्र.०३ | वॉर्ड क्र.३४, आरती नगर अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे. आर्थिक तरतुद र.रु.२० लक्ष | वॉर्ड क्र.३४ अंतर्गत नविन सिमेंट कॉंक्रिट रस्ता तयार करणे. या कामासाठी र.रु.२० लक्ष वळती करण्यात यावी. |
| SCR-ZONE-5-P.N.18 अ.क्र.०२ | वॉर्ड क्र.३४ अंतर्गत अण्णाभाऊ साठे सभागृह बांधणे. आर्थिक तरतुद र.रु.१५ लक्ष | वॉर्ड क्र.३४ मध्ये व्यायाम शाळेकरीता विविध नविन साहित्य खरेदी करणे. या कामासाठी र.रु.१५ लक्ष वळती करण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७००:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३४ मध्ये सध्या गोर-गरीब रहिवासीयांना त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून व्यायाम शाळा नसल्याने युवकांचे आरोग्य चांगले राहत नाही. गरीब रहिवासीयांना व्यायाम शाळा उपलब्ध व्हावी म्हणुन वॉर्डात उपलब्ध जागा भाड्याने घेऊन वॉर्डात मनपातर्फे व्यायाम शाळा सुरु करण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती संगीता सुभाष वाघुले **अनुमोदक:-** श्री.कादरी जमीर अहेमद रहिम अहेमद

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३४ येथे उपलब्ध जागा भाड्याने घेऊन मनपातर्फे व्यायाम शाळा सुरु करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७०१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०२, कबीरनगर येथे महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात येत असलेले आरोग्य केंद्राचे काम पुर्ण होत आहे. त्या आरोग्य केंद्रास सिध्दार्थ गौतम बुध्द यांच्या आईचे नाव "महामाया" असे नाव देण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

**अनुमोदक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग, श्रीमती आशा विजय निकाळजे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०२, कबीरनगर येथे महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात येत असलेल्या आरोग्य केंद्रास सिध्दार्थ गौतम बुध्द यांच्या आई "महामाया" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७०२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०२, कबीरनगर अंतर्गत मुरलीधर नगर अशी वसाहत आहे. त्या वसाहतीचे नाव मुरलीधर नगर ऐवजी "महर्षी वाल्मिकी नगर" असे नामांतर करण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

**अनुमोदक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग, श्रीमती आशा विजय निकाळजे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०२, कबीरनगर अंतर्गत असलेल्या मुरलीधर नगर या वसाहतीचे नाव मुरलीधर नगर ऐवजी "महर्षी वाल्मिकी नगर" असे नामांतर करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७०३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.वेतन-११०९/प्रक-४४/सेवा/-३ दि.०१ एप्रिल २०१० व वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.वेतन-११११/प्रक्र-८/सेवा ३, दि.०१ जुलै २०११ अन्वये ज्या कर्मचाऱ्यांची नियमीत २४ वर्षाची सेवा झालेली आहे. अशा सर्व कर्मचाऱ्यांना सुधारीत आश्वासीत प्रगती योजनेचा दुसरा लाभ प्रदान करण्यासाठी पदोन्नती साखळीतील वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी देण्याबाबत अंमलबजावणी कार्यपध्दती, अटी व शर्ती देखील सदर शासन निर्णयात नमुद करण्यात आलेल्या आहेत.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम-५४ (१) अन्वये गठीत केलेल्या निवड

समितीने दिनांक २२.०८.२०१७ रोजीच्या बैठकीतील अहवालानुसार अधिकारी/कर्मचाऱ्यांना ज्यांची नियमीत २४ वर्षाची सलग सेवा झालेल्या आहेत व ज्यांची शैक्षणिक पात्रता पदवीधर आहे, केवळ अशाच वरिष्ठ लिपीक व लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागु करण्यात आलेली आहे.

परंतु औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवरील ज्या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता पदवीधर नाही अशा सर्व वरिष्ठ लिपीक व लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांना २४ वर्षाची सलग सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना आश्वासीत प्रगती योजनेचा दुसरा लाभ प्रदान करण्यात आलेला नाही.

राज्यातील "वसई-विरार शहर महानगरपालिका" "नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका" व "नाशिक महानगरपालिकेने" शैक्षणिक पात्रता पदवीधर नसतांना सुध्दा त्यांच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची ज्या कर्मचाऱ्यांनी नियमित २४ वर्षाची सलग सेवा झालेली आहे अशा कर्मचाऱ्यांना आश्वासीत प्रगती योजनेचा दुसरा लाभ प्रदान करते वेळी फक्त गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी लक्षात घेऊन सर्वच कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार सुधारीत सेवा अंतर्गत आश्वासीत प्रगती योजना सदर शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार लागु करण्यात आलेली आहे. तसेच समुदाय संघटक याची पदोन्नती साखळीतील दुसऱ्या लाभाच्या पदाची अर्हता नसतांना २४ वर्षाची सेवा झाल्या नंतरच्या वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आलेला आहे.

करीता, राज्यातील इतर महानगरपालिकेचा विचार करता व शासन निर्णयातील तरतुदीचा विचार करता ज्या वरिष्ठ लिपीक व लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठेतेनुसार नियमित २४ वर्षाची सलग सेवा झालेली आहे. अशा सर्वच वरिष्ठ लिपीक व लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने आश्वासीत प्रगती योजनेचा दुसरा लाभ लागु करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विकास रतनलाल जैन

**अनुमोदक:-**श्री.विजय साईनाथ औताडे, श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राज्यातील "वसई-विरार शहर महानगरपालिका" "नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका" व "नाशिक महानगरपालिकेने" शैक्षणिक पात्रता पदवीधर नसतांना सुध्दा त्यांच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची ज्या कर्मचाऱ्यांनी नियमित २४ वर्षाची सलग सेवा झालेली आहे अशा कर्मचाऱ्यांना आश्वासीत प्रगती योजनेचा दुसरा लाभ प्रदान केला असल्याने व शासन निर्णयातील तरतुदीचा विचार करता ज्या वरिष्ठ लिपीक व लिपीक संवर्गातील शैक्षणिक पात्रता पदवीधर नसलेल्या कर्मचाऱ्यांची व सेवा ज्येष्ठेतेनुसार नियमित २४ वर्षाची सलग सेवा झालेली आहे अशा वरिष्ठ लिपीक व लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने आश्वासीत प्रगती योजनेचा दुसरा लाभ लागु करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच राज्यातील "वसई-विरार शहर महानगरपालिका", "नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका" व "नाशिक महानगरपालिकेने" दिलेली वेतनश्रेणी-वेतनबँड रु.९,३००/- ते रु.३४,०००/- ग्रेड पे ४,२००/- देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७०४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११०, मयुरबन कॉलनी हा वॉर्ड मुस्लीम बहुलक्षेत्र असुन सदर वॉर्डांतर्गत शंभुनगर भागामध्ये जवळपास ५०% अल्पसंख्याक नागरीक असून बऱ्याच वर्षापासून हा भाग विकास कामापासून वंचित असून अल्पसंख्याक प्रधानमंत्री जन विकास योजने

अंतर्गत विकास कामे करणे अत्यंत गरजेचे आहे. ह्या कामासाठी रक्कम रु.०१ कोटी तरतुद करण्यात यावी. ती कामे खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **विकास कामांचा नाव** | **र.रुपये** |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.११०, मयुरबन कॉलनी, शंभूनगर या भागामध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | रु.७० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.११०, मयुरबन कॉलनी अंतर्गत विविध ठिकाणी पिण्याची पाण्याची लाईन टाकणे. | रु.३० लक्ष |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे **अनुमोदक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११०, मयुरबन कॉलनी या मुस्लीम बहुलक्षेत्र वॉर्डांतर्गत शंभुनगर भागामध्ये अल्पसंख्याक प्रधानमंत्री जन विकास योजने अंतर्गत विकास कामासाठी र.रु.०१ कोटी तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते.

| **अ.क्र.** | **विकास कामांचा नाव** | **र.रुपये** |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.११०, मयुरबन कॉलनी, शंभूनगर या भागामध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | रु.७० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.११०, मयुरबन कॉलनी अंतर्गत विविध ठिकाणी पिण्याची पाण्याची लाईन टाकणे. | रु.३० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७०५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर हा वॉर्ड मुस्लीम बहुल वॉर्ड असून सदर वॉर्डामध्ये अंतर्गत हुसैन कॉलनी भागामध्ये जवळपास ९०% नागरीक हे अल्पसंख्याक आहे. बऱ्याच वर्षापासून हा भाग विकास कामापासून वंचित आहे. करिता, वॉर्डामध्ये विकास होणेसाठी शासनाच्या प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम अंतर्गत निधी प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात यावा. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| **अ.क्र.** | **विकास कामांचे नाव** | **र.रुपये** |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७९ अंतर्गत हुसैन कॉलनी या भागामध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१ कोटी ४० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.७९ अंतर्गत हुसैन कॉलनी या भागामध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.६० लक्ष |

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर या मुस्लीम बहुल वॉर्डाअंतर्गत हुसैन कॉलनी भागामध्ये शासनाच्या प्रधान मंत्री जनविकास कार्यक्रम अंतर्गत खालील प्रमाणे निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामांचे नाव | र.रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७९ अंतर्गत हुसैन कॉलनी या भागामध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१ कोटी ४० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.७९ अंतर्गत हुसैन कॉलनी या भागामध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.६० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७०६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर हा वॉर्ड दलित वस्ती बहुल वॉर्ड असून सदर वॉर्डामध्ये ५०% पेक्षा जास्त दलित नागरीक राहतात. सदर भाग हा बऱ्याच वर्षापासून विकास कामांपासून वंचीत आहे. करीता, सदर भागाचा विकास होणेसाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजना सन २०१८-२०१९ वर्षामधून निधी प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात यावा.

| अ.क्र. | विकास कामांचा नाव | र.रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१.५० कोटी |
| २. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर भागातील बौध्द विहार येथे सामाजिक सभागृह बांधणे. | रु.३० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर भागामध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.२० लक्ष |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर या दलित वस्ती बहुल वॉर्डात शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामांचा नाव | र.रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१.५० कोटी |
| २. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर भागातील बौध्द विहार येथे सामाजिक सभागृह बांधणे. | रु.३० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर भागामध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.२० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७०७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९३, पुंडलिकनगर अंतर्गत या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर दलित वस्ती लोकसंख्या असून त्या ठिकाणी विकास कामे करणे अत्यंत आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निधी |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.९३, पुंडलिकनगर अंतर्गत पाण्याचे पाईप टाकणे. | ३० लाख |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती मिना रामदास गायके **अनुमोदक:-**श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९३, पुंडलिकनगर येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विकास कामे करण्यासाठी निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | निधी |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.९३, पुंडलिकनगर अंतर्गत पाण्याचे पाईप टाकणे. | ३० लाख |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७०८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०३, एकतानगर हा वॉर्ड मुस्लिम बहुल वॉर्ड असून सदर वॉर्डामध्ये अंतर्गत जहागीर कॉलनी, एकतानगर भागामध्ये जवळपास ७५ टक्के नागरीक हे अल्पसंख्यांक आहे. बऱ्याच वर्षापासून हा भाग विकास कामांपासून वंचित आहे. करीता, वॉर्डामध्ये विकास होणेसाठी शासनाच्या प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम अंतर्गत निधी प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

| अ.क्र. | विकास कामाचे नाव | र.रु. |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.०३, एकतानगर भागामध्ये विविध ठिकाणी कॉँक्रीटीकरण करणे | रु.१ कोटी ४० लक्ष |
| २ | वॉर्ड क्र.०३, एकतानगर भागामध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे | रु.६० लक्ष |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे **अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०३, एकतानगर या मुस्लिम बहुल वॉर्डाअंतर्गत जहागीर कॉलनी, एकतानगर भागामध्ये शासनाच्या प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम अंतर्गत खालील प्रमाणे निधी प्राप्त होण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामाचे नाव | र.रु. |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.०३, एकतानगर भागामध्ये विविध ठिकाणी कॉँक्रीटीकरण करणे | रु.१ कोटी ४० लक्ष |
| २ | वॉर्ड क्र.०३, एकतानगर भागामध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे | रु.६० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७०९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०३, एकतानगर हा वॉर्ड दलित बहुल वॉर्ड असून सदर वॉर्डामध्ये ६५% पेक्षा जास्त दलित नागरीक राहतात. सदर भाग हा बऱ्याच वर्षापासून विकास कामांपासून वंचित आहे. करीता सदर भागाचा विकास होणेसाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजना सन २०१८-२०१९ या वर्षामधून निधी प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | विकास कामांचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.०३, एकतानगर भागामध्ये विविध ठिकाणी कॉँक्रीटीकरण करणे. | रु.५० लक्ष |

**सुचक:-**श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे **अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०३, एकतानगर या दलित बहुल वॉर्डामध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील प्रमाणे निधी प्राप्त होण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामांचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.०३, एकतानगर भागामध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | रु.५० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७१०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९७, रामकृष्णनगर/काबरानगर अंतर्गत इंदिरानगर सुतगिरणी परिसर, बिडी काबरानगर, बजरंगनगर हा भाग मोठ्या प्रमाणात दलित वस्ती असून या परिसरात बऱ्याच वर्षापासून विकास कामे झालेली नाहीत. उदा. रस्ते, ड्रेनेज लाईन, पिण्याच्या पाण्याची लाईन, पथदिवे या विविध कामासाठी दलित वस्ती योजने अंतर्गत निधी मिळण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सीमा काहानुलाल चक्रनारायण **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९७, रामकृष्णनगर/काबरानगर अंतर्गत इंदिरानगर सुतगिरणी परिसर, बिडी काबरानगर, बजरंगनगर मधील दलित वस्ती मध्ये रस्ते, ड्रेनेज लाईन, पिण्याच्या पाण्याची लाईन, पथदिवे या विविध कामासाठी दलित वस्ती योजने अंतर्गत निधी मिळण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७११:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९७ अंतर्गत प्रियदर्शनीनगर, इंदिरानगर, बौध्द विहार परिसर व मुख्य रस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा व परिसर सिमेंट रस्ते व ड्रेनेज लाईन, विद्युत पोल, इंदिरानगर मुख्य गटार नाला, पिण्याच्या पाण्याची समस्या, व्यायाम शाळा, वाचनालय, सामाजिक सभागृह उभारणे, इ. विकास कामे करणे गरजेचे असून वरील सुविधा पासून या भागातील नागरीकांना बऱ्याच वर्षापासून सुविधापासून वंचित राहावे लागत आहे. या भागातील नागरीकांची कळकळीची विनंती असून निधी मिळण्याकरीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त शासनाकडे व समाज कल्याण विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सीमा काहानुलाल चक्रनारायण **अनुमोदक:-**श्री.सचिन सुर्यकांत खैरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९७ अंतर्गत प्रियदर्शनीनगर, इंदिरानगर, बौध्द विहार परिसर व मुख्य रस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा व परिसर सिमेंट रस्ते व ड्रेनेज लाईन, विद्युत पोल, इंदिरानगर मुख्य गटार नाला, पिण्याच्या पाण्याची समस्या, व्यायाम शाळा, वाचनालय, सामाजिक सभागृह उभारणे, इ. विकास कामांसाठी निधी मिळण्याकरीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त शासनाकडे व समाज कल्याण विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७१२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका शाळेत शिकणारे विद्यार्थी हे खुप गरीब घरातील आहे. १० वी पर्यंत त्यांना उत्तम शिक्षण मिळते व योग्य मुलांचा आपण सत्कार करून त्यांना बक्षीस स्वरुप काही रक्कम देवून त्यांचा सन्मान करतो. परंतु १२ वी नंतर काही विद्यार्थी सी.ई.टी./निट मध्ये उत्तम मार्कस् घेऊन त्यांना इंजिनिअरींग किंवा मेडीकलसाठी फीस अभावी जाता येत नाही. तर ते विद्यार्थी सी.ई.टी./निट मध्ये उत्तम मार्कस् घेऊन पुढे शिक्षण घेवु इच्छितात त्यासाठी महानगरपालिकेने शैक्षणिक खर्चा बरोबर अशा मुलांसाठी रु.५ लक्षची तरतुद करावी व सामाजिक बांधीलकी म्हणून एक अशी पतपेढी तयार करावी. ज्यामध्ये ११५ नगरसेवकांच्या मानधनातून, महानगरपालिकेच्या सर्व शाळांतील शिक्षक व शिक्षिकांच्या तसेच मनपाच्या सर्व अधिकाऱ्यांच्या पगारातून प्रत्येकी दरमहा रु.१००/- जर कपात केले तर महानगरपालिकेतील शिक्षण घेणारे विद्यार्थी सुध्दा डॉक्टर किंवा इंजिनिअर होतील. पण यामध्ये जी मुले निवडली जातील ती मुले १० वी पर्यंत महानगरपालिकेच्या शाळेतच शिकलेली असावी व तशी मुले निवडण्यासाठी एक कमिटी तयार करावी व महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी सुध्दा यशाची शिखरे गाठतील.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-**श्रीमती माधुरी मिलींद देशमुख

मा.महापौर :नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी. विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या शाळेतील १० वी व १२ वी पर्यंत शिक्षण घेतल्यानंतर उच्च दर्जाचे शिक्षण घेण्यासाठी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७१३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२४, शहाबाजार हा प्रभाग अल्पसंख्यांक बहुल समुदायाचा असल्यामुळे जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्र जावक क्र.२०१८-सा.प्र./अल्पसंख्यां/कावि-३१७ दिनांक २९.०९.२०१८ अन्वये १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाअंतर्गत केंद्र शासनाकडून अल्पसंख्यांक समुदायाच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी राज्यासाठी उपलब्ध होणे शक्य आहे.

माझे वॉर्डात खालील विकास कामे करणे गरजेचे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. पोल सहित लाईट फिटींग लावण्यासाठी | - | रु.१० लक्ष |
| २. विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकण्याकरीता | - | रु.१० लक्ष |
| ३. वॉर्डांतर्गत गल्ल्यात कॉंक्रीटींग करणे | - | रु.१५ लक्ष |
| ४. वॉर्डांतर्गत इतर विकासाचे कामे करण्या करीता | - | रु.१५ लक्ष |

सदर कार्यक्रम १४ व्या वित्त आयोगाच्या जन विकास योजनेमध्ये वॉर्ड क्र.२४, शहाबाजार मध्ये विकास कामे करण्याकरीता रु.५० लक्षचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी असल्यामुळे या विकास कामामुळे अल्पसंख्यांक समुदायाचा एकंदर जीवनमानाचा दर्जा उंचवण्यासाठी १४ वित्त आयोगा अंतर्गत प्रधानमंत्री जनविकास योजनेतून रु.५० लक्षचा निधी मिळण्याकरीता प्रस्ताव मंजुर करून जिल्हाधिकारी सामान्य प्रशासन विभागाला पाठविण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी **अनुमोदक:-**श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२४, शहाबाजार या अल्पसंख्यांक बहुल भागात केंद्र शासनाकडून अल्पसंख्यांक समुदायाच्या विकासासाठी राज्यासाठी मिळणाऱ्या निधीमधून खालील विकास कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १. पोल सहित लाईट फिटींग लावण्यासाठी | - | रु.१० लक्ष |
| २. विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकण्याकरीता | - | रु.१० लक्ष |
| ३. वॉर्डांतर्गत गल्ल्यात कॉंक्रीटींग करणे | - | रु.१५ लक्ष |
| ४. वॉर्डांतर्गत इतर विकासाचे कामे करण्या करीता | - | रु.१५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७१४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती शेख शाहजहॉं अहमद, पोस्ट सहाय्यक शिक्षक, भिवंडी, मुंबई हे वॉर्ड क्र.१०८, सिल्क मिल कॉलनी, औरंगाबाद येथे मागील १० वर्षापासून वास्तव्यास असून त्या सध्या भिवंडी महानगरपालिकेच्या शाळेत सहाय्यक शिक्षिका या पदावर कार्यरत असून त्यासाठी त्या औरंगाबाद ते भिवंडी येथे आठवड्यात येणे-जाणे करीत आहेत. परंतु सद्यस्थितीला त्यांच्या आईचे वय जास्त असल्यामुळे व त्या सतत आजारी राहत असल्यामुळे तसेच त्यांचे वडील हयात नाहीत व त्यांना असलेल्या एक पाच वर्षाचा लहान मुलगा याला सांभाळण्याची जबाबदारी सुध्दा त्यांच्यावरच आहे.

करीता वरील सर्व अडचणी लक्षात घेता, श्रीमती शेख शाहजहॉं अहमद, सहाय्यक शिक्षिका, महानगरपालिका भिवंडी यांची बदली करून त्यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळेत सहाय्यक शिक्षीका या पदावर रुजू करण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोद्दीन **अनुमोदक:-**श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती शेख शाहजहॉं अहमद, सहाय्यक शिक्षिका, महानगरपालिका भिवंडी, मुंबई यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळेत सहाय्यक शिक्षीका या पदावर सामावून घेण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७१५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३४ मध्ये गोर-गरीब व मोलमजुरी करणारे रहिवासी आहेत. सदरील स्लम भागातील महिला गरीब असल्याने गर्भवती असतांना सुध्दा त्या काम करतात आणि आरोग्याच्या कोणत्याही तपासण्या करीत नाहीत. त्यामुळे त्यांना प्रसूतीच्या काळात फार त्रास सहन करावा लागतो. मिसरवाडी मध्ये कोठेही प्रसुतीगृह नसल्याने तसेच अनेक महिलांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांची प्रसुती बहुतांश राहत्या घरीच करावी लागते. ज्यामुळे अनेक गर्भवती महिलांच्या जीवीतास सदैव धोका निर्माण झालेला असतो.

करीता वॉर्ड क्र.३४, मिसरवाडी भागात मनपातर्फे जागा भाड्याने घेऊन गरीब महिलांसाठी प्रसुतीगृह सुरू करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती संगिता सुभाष वाघुले **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे
मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३४, मिसरवाडी भागात मनपातर्फे जागा भाड्याने घेऊन गरीब महिलांसाठी प्रसुतीगृह सुरू करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७१६:-** **(कार्यकारी अभियंता ड्रेनेज)**

**(टिप:- दिनांक ११.०९.२०१८ (का.प.क्र.१९) रोजीच्या सर्वसाधारण सभेतील स्थगित विषय क्रमांक-६४८ मा.विरोधी पक्षनेता यांच्या पत्रान्वये पुर्नविचारार्थ सादर.)**

शहरातील बुढ्ढीलेन परिसरातील मिळकत न.भू.क्र.३२०८, नेहरुभवन ही नाट्यगृह इमारत शहरातील नागरीकांना व रंगकर्मी यांच्या सार्वजनिक उपयोगाकरीता तत्कालीन नगरपालिकेने सुमारे ४० वर्षापुर्वी उभारलेली आहे. या इमारतीमध्ये नाट्यगृहाचा वापर कलावंत व रंगकर्मी यांच्याकडून होत नसल्याने या इमारतीचा वापर मागील काही वर्षापासून मुळ उद्देशासाठी होत नाही. सदर इमारत सद्यस्थितीत केवळ लग्न व इतर खाजगी समारंभाकरीता भाडेतत्वावर देणेबाबत शहरातील नागरीकांची मागणी येत होती. या कारणाने सदर इमारतीपासून महानगरपालिकेस अल्प उत्पन्न प्राप्त होत असल्याने व त्या मानाने या इमारतीचा देखभाल दुरूस्ती खर्च जास्त येत असल्याने सदर बाब महानगरपालिकेस परवडणारी नाही. याच अनुषंगाने शहरातील प्रतिष्ठीत नागरीक व स.नगरसेवक यांची सदर पुनर्विकास करण्याची मागणी करण्यात येत होती.

शहरातील नागरीकांना नवीन अद्यावत असे प्रेक्षागृह व समारंभ हॉल तयार करण्याच्या दृष्टिकोनातून व सदर परिसराचा टी.व्ही.सेंटर येथे उभारण्यात येत असलेल्या शॉपींग कॉम्प्लेक्स व क्रिडांगणाच्या धर्तीवर नेहरूभवन इमारत पाडून त्या ठिकाणी दुकाने, कार्यालये, प्रेक्षागृह व समारंभ हॉल बांधण्याचे नियोजन करण्यात येत आहे. सदरचा प्रकल्प हा १०० टक्के लोकसहभागातून म्हणजेच या प्रस्तावित संकुलामध्ये बांधण्यात येणारी दुकाने व कार्यालये पुढील ३० वर्षासाठी ठरावीक आरंभीक रक्कम एकत्रितपणे घेऊन त्या द्वारे उभा राहणाऱ्या निधीतून करण्याचे योजिले आहे. या कारणाने महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक भार येणार नाही. अद्यावत अशा बांधण्यात येणाऱ्या नेहरुभवन इमारतीमुळे या परिसरातील व्यापार व व्यवसाय वृध्दींगत होणार असून यामधून बांधण्यात येणाऱ्या दुकाने व कार्यालये विक्रीनंतर महानगरपालिकेचे अद्यावत असे प्रेक्षागृहे, समारंभ हॉल (मेजवानी हॉल) विनासायस प्राप्त होणार आहे. यामुळे शहरातील नागरीकांना व कलावंतांना एक चांगले व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

नेहरुभवन या जागेचे विकास योजना रस्त्याने बाधीत झाल्यानंतरचे क्षेत्र ४०५० चौमी असून या प्रस्तावित नवीन संकुलामध्ये खालील नमुद प्रमाणे बांधकामाचा समावेश असून त्याचे एकूण बांधीव क्षेत्रफळ ६९४८.५७ चौमी (अंदाजे) असणार आहे.

| **विवरण** | **बांधकाम क्षेत्रफळ (चौमी)** | **जागेचा वापर** | |
|---|---|---|---|
| **भु-मजला** | **१९६०.४६ चौमी** | **वाहनतळ** | **वाहनतळ सुविधा** |
| तळमजला | १६३१.४३ चौमी | एकूण दुकाने २६ | मेजवानी हॉल, वेटिंग रुम, लॉबी, चेजींग रुम, व्हिजीटर रुम, महिला व पुरूषांकरीता स्वतंत्र प्रसाधनगृह. |
| पहिला मजला | २१३१.०२ चौमी | एकुण व्यापारी कार्यालये १२ | ६०० प्रेक्षक क्षमता असलेले प्रेक्षागृह, लाईटिंग साऊंड सिस्टीमसह रुम (ग्रीन रुम) प्रसाधनगृह, लॉबी, चेजींगरूम, व्हिजीटर रुम, मल्टिपर्पज हॉल स्नॅक्स लॉबी इत्यादी. |
| दुसरा मजला | १२२५.६०० चौमी | एकुण व्यापारी कार्यालये १२ | प्रेक्षागृह बाल्कनी व्यतिरीक्त लॉबी, स्नॅक्स, लॉबी, प्रसाधनगृह, गॅलरी. |

वरील परिच्छेदात नमुद प्रमाणे या संकूलात २६ दुकाने, २४ व्यापारी कार्यालये, प्रेक्षागृह आणि मेजवानी हॉल महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना रितसर अटी व शर्तीवर ३० वर्षासाठी भाडेतत्वावर (Lease Rent) देऊन संबंधीतांकडून आगाऊ रक्कम भरणा करून घेऊन उभारण्याचे प्रस्तावित आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेस सदर प्रकल्पाचे बांधकाम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीनूसार अंदाजे रु.१३.२३ कोटी एवढा खर्च अपेक्षीत आहे. या प्रकल्पातील दुकाने व कार्यालये ३० वर्षासाठी भाडेतत्वावर दिल्यानंतर त्यातून महानगरपालिकेस अंदाजे रु.१७.१२ कोटीचे उत्पन्न अपेक्षीत आहे. तसेच या व्यतिरीक्त ६०० प्रेक्षक क्षमता असलेले प्रेक्षागृह, ६०० ते ७०० माणसे क्षमता असलेला मेजवानी हॉल, पार्किंगची जागा अशी अंदाजे रु.३.५० कोटीची स्थावर मालमत्ता निर्माण होऊन मिळणार आहे. सदरील योजनेतील दुकाने व कार्यालयाचे क्षेत्रफळ हे प्राथमिक स्वरुपाचे असून ते अंदाजीत स्वरुपात घेण्यात आले आहे. यामध्ये प्रत्यक्ष नियोजन करतांना किरकोळ बदल होऊ शकतो.

करीता सदरचा प्रकल्प विकसीत करणे यासाठी प्रकल्पाला तत्वत: मान्यता मिळावी आणि प्रकल्पाचे सविस्तर आर्थिक व तांत्रिक तसेच प्रकल्पाची उपयोगितता तज्ञ व्यक्तींकडून (Financial and Technical Feasibility through Independent Expert) एजन्सीकडून करून घेण्याच्या मान्यतेस्वत सादर.

मा.महापौर :प्रस्तुत प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक ७१७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक १२.१०.२०१८ रोजी मनपा वॉर्ड क्र.३७, चौधरी कॉलनी अंतर्गत हिनानगर येथे डेंग्यु तापामुळे अत्यंत गरीब कुटूंबातील मुलगी कु.रुतूजा सोनाजी कांबळे हिचा मृत्यु झालेला आहे. तसेच मयत मुलगी कु.रुतूजा सोनाजी कांबळे हिच्या बहीणीला सुध्दा ताप येत असल्याने सदरील कुटूंब मानसिक तणावात आहेत.

सदरील गरीब कुटूंबीयास औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे किमान र.रु.५ लक्षची आर्थीक मदत तात्काळ करण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद

**अनुमोदक:-**श्री.सोहेल शकील शेख,श्री.गंगाधर नामदेव ढगे

मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३७, चौधरी कॉलनी अंतर्गत हिनानगर येथील डेंग्यु तापामुळे मृत पावलेल्या कु.रुतूजा सोनाजी कांबळे हिच्या कुटूंबीयास औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे रु.५ लक्षची आर्थीक मदत करण्यासाठी प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७१८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११०, मयुरबन कॉलनी हा वॉर्ड मुस्लिम बहुल वॉर्ड असून सदर वॉर्डामध्ये अंतर्गत शंभुनगर भागामध्ये जवळपास ५०% नागरीक हे अल्पसंख्याक आहे. बऱ्याच वर्षापासून हा भाग विकास कामापासुन वंचित आहे.

करीता, वॉर्डामध्ये विकास होणेसाठी शासनाच्या प्रधान मंत्री जनविकास कार्यक्रम अंतर्गत निधी प्राप्त करण्याकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | विकास कामांचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.११०, मयुरबन कॉलनी, शंभुनगर या भागामध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | रु.७० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.११०, मयुरबन कॉलनी अंतर्गत विविध ठिकाणी पिण्याची पाण्याची लाईन टाकणे. | रु.३० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११०, मयुरबन कॉलनी या मुस्लिम बहुल वॉर्डामध्ये अंतर्गत शंभुनगर भागामध्ये शासनाच्या प्रधान मंत्री जनविकास कार्यक्रम अंतर्गत खालीलप्रमाणे निधी प्राप्त होण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामांचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.११०, मयुरबन कॉलनी, शंभुनगर या भागामध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | रु.७० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.११०, मयुरबन कॉलनी अंतर्गत विविध ठिकाणी पिण्याची पाण्याची लाईन टाकणे. | रु.३० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७१९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४४, रोशनगेट हा अल्पसंख्याक बहुल रहिवासीयांचा वॉर्ड असल्यामुळे जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.२०१८-सा.प्र./अल्पसंख्याक/कावि-३१७ दिनांक २९.०९.२०१८ अन्वये १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाअंतर्गत केंद्र शासनाकडून अल्पसंख्याक समुदायाचा विकासासाठी जास्तीत जास्त निधी राज्यासाठी उपलब्ध होणे शक्य आहे.

१. वॉर्ड क्र.४४ मध्ये विविध ठिकाणी पोल सहित लाईट फिटींग लावण्यासाठी, रु.१० लक्ष.
२. वॉर्ड क्र.४४ मध्ये करीम कॉलनी एशिया दुध डेअरी ते हफीज भाई यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता तयार करणे, रु.२० लक्ष.
३. वॉर्ड क्र.४४ जनता किराणा ते साबेरभाई वेल्डर यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे, रु.२० लक्ष.
४. वॉर्ड क्र.४४ मध्ये विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. रु.१० लक्ष.

करीता, १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत प्रधानमंत्री जनविकास योजनेतून रु.६० लक्षचा निधी मिळण्यासाठी प्रस्ताव मंजुर करून जिल्हाधिकारी सामान्य प्रशासन विभागाला पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी **अनुमोदक:-**श्रीमती शेख समिना शेख इलियास

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४४, रोशनगेट या अल्पसंख्याक बहुल वॉर्डात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रमाअंतर्गत केंद्र शासनाकडून अल्पसंख्याक समुदायाचा विकासासाठी मिळणाऱ्या निधीतून खालील विकास कामे करण्यासाठी निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते.

१. वॉर्ड क्र.४४ मध्ये विविध ठिकाणी पोल सहित लाईट फिटींग लावण्यासाठी, रु.१० लक्ष.
२. वॉर्ड क्र.४४ मध्ये करीम कॉलनी एशिया दुध डेअरी ते हफीज भाई यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता तयार करणे, रु.२० लक्ष.
३. वॉर्ड क्र.४४ जनता किराणा ते साबेरभाई वेल्डर यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे, रु.२० लक्ष.
४. वॉर्ड क्र.४४ मध्ये विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. रु.१० लक्ष. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भिमनगर, भावसिंगपुरा येथे बहुल अल्पसंख्यांक नागरीक वास्तव्यास आहेत. या भागामध्ये नवबौध्द, ख्रिश्चन व मुस्लिम समाजाची लोकसंख्या ८० टक्के प्रमाणात असून गेले अनेक वर्षापासून मुलभूत सुविधांपासून वंचित असलेली या भागाअंतर्गत असलेल्या अल्पसंख्यांक वस्त्या, भावसिंगपुरा गाव, गावठाण, गीतानगर, कोयनानगर, पंडित कॉलनी, साठेनगर, मुक्ताईनगर, बॉबीनगर, दिपनगर, नवयुग कॉलनी, कानिफनाथ कॉलनी, प्रभात नगर, साईनगर, शहा कॉलनी, गौतम नगर व गोल्डन सिटी या सर्व वसाहतींमध्ये अनेक वर्षापासून पीण्याचे पाणी, सिमेंट कॉंक्रीट रस्ते, ड्रेनेज लाईन, दिवाबत्ती, नाल्याचे संरक्षण भिंत, पुल बांधणे, वाचनालय उभारणे, स्मशानभुमी, आर.सी.सी.शेड उभारणे, सामाजिक सभागृह उभारणे, कब्रस्थान विकसीत करणे, व्यायामशाळा उभारणे गरजेचे असून वरील सर्व सुविधांपासून भिमनगर, भावसिंगपुरा या भागातील नागरीक बऱ्याच वर्षापासून वंचित आहे. सर्वसाधारण सभेमध्ये शासनाच्या अल्पसंख्यांक प्रधानमंत्री जनविकास योजनेअंतर्गत विकास कामे करण्यासाठी निधी मिळण्याकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे **अनुमोदक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भिमनगर, भावसिंगपुरा येथे असलेल्या अल्पसंख्यांक बहुल असलेल्या भावसिंगपुरा गाव, गावठाण, गीतानगर, कोयनानगर, पंडित कॉलनी, साठेनगर, मुक्ताईनगर, बॉबीनगर, दिपनगर, नवयुग कॉलनी, कानिफनाथ कॉलनी, प्रभात नगर, साईनगर, शहा कॉलनी, गौतम नगर व गोल्डन सिटी या सर्व वसाहतींमध्ये पिण्याचे पाणी, सिमेंट कॉंक्रीट रस्ते, ड्रेनेज लाईन, दिवाबत्ती, नाल्याचे संरक्षण भिंत, पुल बांधणे, वाचनालय उभारणे, स्मशानभुमी, आर.सी.सी.शेड उभारणे, सामाजिक सभागृह उभारणे, कब्रस्थान विकसीत करणे, व्यायामशाळा उभारणे इ.विविध विकास कामे करण्यासाठी शासनाच्या अल्पसंख्यांक प्रधानमंत्री जनविकास योजनेअंतर्गत निधी मिळण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५० अंतर्गत अशोकनगर, लक्ष्मी कॉलनी, प्रज्ञानगर, महादेव मंदीर या भागात वेळेवर व पुरेसे पाणी पुरवठा होत नसल्याने या भागातील नागरीकांची गैरसोय होत आहे. पाणी पुरवठ्या बाबत या भागातील नागरीक वारंवार तक्रारी करीत आहेत. या भागात नागरीकांची गैरसोय दुर होणेकरीता पाण्याची टाकी बांधणे आवश्यक आहे.

करीता, लक्ष्मी कॉलनी भागात १५.०० लक्ष लीटर क्षमतेची पाण्याची टाकी बांधणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-**श्रीमती नसरीन बेगम समद यार खान **अनुमोदकः-**श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५० येथे अशोकनगर, लक्ष्मी कॉलनी, प्रज्ञानगर, महादेव मंदीर या भागात १५.०० लक्ष लीटर क्षमतेची पाण्याची टाकी बांधणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळीचे विषय

**विषय क्रमांक ७२२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको प्रशासनातर्फे एन-६, सिडको, औरंगाबाद येथे महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आलेली सात हेक्टर जागेवर स्वर्गीय मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने स्मृतीवन व स्मारक उभारण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.५४४ दि.३१.०८.२०१६ अन्वये मंजुर केलेला आहे. शासन निर्णय क्र.स्मारक २०१६/अनौ-१८/(प्र.क्र.२७९/१६/नवि-२४) दि.१७.०४.२०१७ अन्वये औरंगाबाद जिल्ह्याचे मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सदर स्मृतीवन व स्मारक उभारण्याकरीता शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.४३४/नवि-२० दि.२९.०३.२०१७ अन्वये रु.५.०० कोटीचा शासन निधी मंजुर करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने प्रस्तावित कामाकरीता संकल्प चित्रे/आराखडे, अंदाजपत्रके व तदनुषंगीक पुढील कामे करण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापन संकल्पनार्थी (पी.एम.सी) म्हणुन प्रकल्प यशस्वीरित्या कार्यान्वीत होईपर्यंत देखरेख करणे इत्यादी करीता वास्तुविशारद मे.ऑर्कहोम यांची मा.स्थायी समिती ठराव क्र.९४ दि.०१.१०.२०१८ अन्वये मान्यता होऊन त्यानुसार कामाचा कार्यादेश दि.०३.१०.२०१८ रोजी देण्यात आलेला आहे.

प्रस्तावित प्रकल्पासंदर्भाने मा.महापौर व मान्यवर यांच्यासोबत झालेल्या सविस्तर चर्चेनुसार वास्तुविशारद मे.ऑर्कहोम यांनी (त्यांचे पत्र क्र.AO/AMC/BTM 101 दि.०३.१०.२०१८ नुसार) स्वर्गीय मा.बाळासाहेब ठाकरे स्मृतीवन व स्मारक विकसीत करणे या प्रकल्प प्रस्तावामध्ये स्वर्गीय मा.बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा उभारणे, फुड कोर्ट व म्युझियम करीता इमारत बांधणे, सर्व्हिस बिल्डींग बांधणे तसेच External Development मध्ये Site Development, The Memorial, The Plaza, Horticulture Works, Electrical Works, External Services, Tanks, Pumps, Fire Fighting And Misecellenious Work इत्यादी कामे प्रस्तावीत करुन प्रकल्पाचे प्राथमिक व नकाशे ढोबळ अंदाजपत्रक सादर केलेले आहेत. त्यानुसार प्रकल्पाची अंदाजपत्रकीय र.रु.४५.०० कोटी इतकी होत आहे.

तरी प्रकल्पाकरीता एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी उभारणे शक्य नसल्याने हा प्रकल्प दोन फेजमध्ये पुर्ण करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

त्यानुसार फेज-१ मध्ये पुतळा उभारणे, फुड कोर्ट व म्युझियम करीता इमारत बांधणे, सर्व्हिस बिल्डींग बांधणे तसेच Partly Site Development, The memorial & Partly electrical works

इ.चा समावेश असून त्याची अंदाजपत्रकीय र.रु.२८.०० कोटी इतकी आहे व फेज-२ मध्ये Remaining Site development, The Plaza, Horticulture Works, Remaining Electrical Works, External Services, Tanks, Pumps, Fire Fighting And Miscellenious Work इ.चा समावेश असून त्याची अंदाजपत्रकीय र.रु.१७.०० कोटी इतकी होत आहे. सदर प्रकल्प दोन फेज मध्ये पुर्ण करण्याचे प्रस्तावित करावे लागणार आहे. कृपया यास मान्यता होणेस्तव विचारार्थ सादर.

तथापि, सदर प्रकल्पाकरीता शासन निर्णय दिनांक २९.०३.२०१७ अन्वये र.रु.०५ कोटीचा निधी शासनाने मंजुर केलेला आहे. प्रकल्पासाठी लागणारा एकूण निधी पाहता मंजुर निधी अत्यल्प प्रमाणात आहे. करीता प्रकल्प पुर्ण करण्यासाठी अतिरीक्त निधी काही प्रमाणात महानगरपालिकेच्या फंडातून व उर्वरित निधी शासनाकडून मिळण्याबाबत शासनास विनंती करावी लागणार आहे.

प्रकल्पाकरीता एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी उभारणे शक्य नसल्याने हा प्रकल्प दोन फेजमध्ये पुर्ण करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

करीता, वरील प्रमाणे मान्यता घेऊन प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :प्रस्ताव दुरुस्तीसह मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको प्रशासनातर्फे एन-६, सिडको, औरंगाबाद येथे महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आलेल्या सात हेक्टर जागेवर स्वर्गीय मा.बाळासाहेब ठाकरे स्मृतीवन व स्मारक विकसीत करणे या प्रकल्प प्रस्तावामध्ये वास्तुविशारद मे.ऑर्कहोम यांनी स्वर्गीय मा.बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा उभारणे, फुड कोर्ट व म्युझियम करीता इमारत बांधणे, सर्व्हिस बिल्डींग बांधणे तसेच External Development मध्ये Site Development, The Memorial, The Plaza, Horticulture Works, Electrical Works, External Services, Tanks, Pumps, Fire Fighting And Misecllenious Work इ. कामे प्रस्तावीत केल्यानुसार र.रु.४५.०० कोटीचे प्राथमिक व ढोबळ अंदाजपत्रक तयार केले असून सदर प्रकल्पाकरीता शासनाकडून र.रु.०५ कोटीचा निधी मंजुर आहे. हा प्रकल्प दोन फेजमध्ये पुर्ण करण्यास मा.राज्य शासनाच्या उपलब्ध निधीस अधिन राहून मनपा फंडातून तरतुद उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येते.

त्यानुसार फेज-१ मध्ये पुतळा उभारणे, फुड कोर्ट व म्युझियम करीता इमारत बांधणे, सर्व्हिस बिल्डींग बांधणे तसेच Partly Site Development, The Memorial & Partly Electrical Works इ.साठी र.रु.२८.०० कोटीच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. फेज-१ साठी राज्य शासनाचा उपलब्ध निधी, मनपाचा व उर्वरीत मा.राज्य शासनाकडून प्राप्त होणारा निधी अशी एकत्रित रु.२८ कोटीची पीएमसी मार्फत नियोजन करुन निविदा प्रक्रिया तात्काळ प्रसिध्द करुन अंतिम करावी व तात्काळ काम सुरु करावे. सदर प्रकल्प पुर्ण करण्यासाठी अतिरीक्त निधी काही प्रमाणात महानगरपालिकेच्या फंडातून उपलब्ध करण्यास आवश्यक त्या आर्थिक तरतुदीस मान्यता देण्यात येत असून मनपाच्या हिश्श्याच्या अर्थसंकल्पीय तरतुदीस देखील मंजुरी देण्यात येते. उर्वरित निधी शासनाकडून मिळण्याकरीता मा.राज्य शासनाकडे पाठपुरावा करावा. तसेच प्रशासकीय व वैधानिक कार्यवाही प्रशासनाने करावी.

फेज-२ मध्ये Remaining Site development, The Plaza, Horticulture Works, Remaining Electrical Works, External Services, Tanks, Pumps, Fire Fighting And Miscellenious Work इ. साठी र.रु.१७.०० कोटीच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. फेज-२ साठी रु.१७.०० कोटीच्या कामाचे नियोजन मनपा प्रशासनाने करावे. उर्वरित आवश्यक निधी मा.राज्य

शासनाकडून मिळण्याकरीता मा.राज्य शासनाकडे पाठपुरावा करावा. तसेच प्रशासकीय व वैधानिक कार्यवाही प्रशासनाने करावी.

**विषय क्रमांक ७२३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६२ व्या धम्मदिक्षा समारंभा निमीत्ताने आपल्या औरंगाबाद या ऐतिहासीक शहरामध्ये रविवार दिनांक ०४ नोव्हेंबर २०१८ रोजी जबिंदा लॉन्स्, बीड बायपास रोड, औरंगाबाद येथे जागतिक दर्जाच्या बुध्दिस्ट फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील फेस्टिव्हलसाठी केंद्र व राज्य शासनातील मंत्री, खासदार, आमदार यांची उपस्थिती राहणार आहेत. तसेच भारत देशातून उपासक व उपासिका उपस्थित राहणार आहेत.

करीता या कार्यक्रमास सामाजिक उत्तर दायित्वाच्या भावनेतून व शहराची नाव लौकिक आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचण्यास मदत होईल या दृष्टिकोनातून रु.५ लाखाची (अक्षरी रक्कम रुपये पाच लाख) आर्थिक मदत करण्यात यावी. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.त्र्यंबक गणपत तुपे **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६२ व्या धम्मदिक्षा समारंभा निमीत्ताने रविवार दिनांक ०४ नोव्हेंबर २०१८ रोजी जबिंदा लॉन्स्, बीड बायपास रोड, औरंगाबाद येथे जागतिक दर्जाच्या बुध्दिस्ट फेस्टिव्हलसाठी रु.५ लाखाची (अक्षरी रक्कम रुपये पाच लाख) आर्थिक मदत करण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७५, बौध्दनगर, उत्तमनगर अंतर्गत बालाजीनगरमध्ये जैन समाज, शिख समाज असून सदर भागामध्ये जवळपास ५०% पेक्षा जास्त अल्पसंख्यांक नागरीक असून हा भाग बऱ्याच वर्षापासून विकास कामांपासून वंचित आहे.

करीता, वार्डामध्ये विकास होणेसाठी शासनाच्या प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम अंतर्गत निधी प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

| अ.क्र. | विकास कामांचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७५, बालाजीनगर अंतर्गत विविध ठिकाणी काँक्रीटीकरण करणे. | रु.०१ कोटी |
| २. | वॉर्ड क्र.७५, बालाजीनगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.०१ कोटी |
| ३. | वॉर्ड क्र.७५, बालाजीनगर अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे. | रु.०१ कोटी |
| ४. | वॉर्ड क्र.७५, बालाजीनगर अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे. | रु.०१ कोटी |
| | **एकुण** | **र.रु.४ कोटी** |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.त्र्यंबक गणपत तुपे **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७५, बौध्दनगर, उत्तमनगर येथे शासनाच्या प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम अंतर्गत निधी प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामांचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७५, बालाजीनगर अंतर्गत विविध ठिकाणी काँक्रीटीकरण करणे. | रु.०१ कोटी |

| | | |
|---|---|---|
| २. | वॉर्ड क्र.७५, बालाजीनगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.०१ कोटी |
| ३. | वॉर्ड क्र.७५, बालाजीनगर अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे. | रु.०१ कोटी |
| ४. | वॉर्ड क्र.७५, बालाजीनगर अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे. | रु.०१ कोटी |
| | **एकुण** | **र.रु.४ कोटी** |

**विषय क्रमांक ७२५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७५, बौध्दनगर, उत्तमनगर ह्या भागात दलित वस्ती असून वॉर्डामध्ये ५०% पेक्षा जास्त दलित नागरीक राहतात. सदर भाग हा बऱ्याच वर्षापासून विकास कामांपासून वंचित आहे.

करीता, सदर भागाचा विकास होणेसाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजना-२०१८-१९ या वर्षामधून निधी प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

| अ.क्र. | विकास कामांचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र. ७५, उत्तमनगर, बौध्दनगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | रु.०२ कोटी |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.त्र्यंबक गणपत तुपे **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७५, बौध्दनगर, उत्तमनगर येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामांचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र. ७५, उत्तमनगर, बौध्दनगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | रु.०२ कोटी |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पाणी पुरवठा कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार दि.०१.०१.२०१० ते दि.३०.०६.२०१८ या सुट्टीच्या कालावधीतही काम केलेले आहे. परंतु जे पाणीपुरवठा मजुर लाईनमनचे काम करतात त्यांना मा.आयुक्तांनी आदेशीत करून ही त्या कामाचे वेतन अद्यापही देण्यात आलेले नाही. तरी सदरील वेतन टप्प्याटप्प्याने का होईना देण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-**श्री.गोकुलसिंग संपतसिंग मलके

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पाणी पुरवठा कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार दि.०१.०१.२०१० ते दि.३०.०६.२०१८ या सुट्टीच्या कालावधीतही केलेल्या कामाचे वेतन देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९५ अंतर्गत विजयनगर, अजिंक्यनगर, भारतनगर हा भाग दलित वस्ती बहुल आहे. करीता या भागात विविध विकास कामे करण्यासाठी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी उपलब्ध व्हावा. म्हणुन प्रस्ताव मा.जिल्हा अधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात यावा. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मोरे ज्योती राजाराम

**अनुमोदक:-**श्रीमती बबीता विजय चावरीया, श्रीमती माधुरी मिलींद देशमुख

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९५ अंतर्गत विजयनगर, अजिंक्यनगर, भारतनगर येथे विविध विकास कामे करण्यासाठी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हा अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर हे एक ऐतिहासीक शहर असून येथे पर्यटक, नागरीक, अभ्यागत तसेच येथील शैक्षणिक वातावरण पुरेसे पोषक आहे. त्यामुळे येथे लगतच्या जिल्ह्यातून विद्यार्थी, अभ्यासक मोठ्या प्रमाणावर येत असतात. या शिवाय येथे मौलाना आझाद संशोधन केंद्र, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र असल्याने व संशोधनाची पुरेशी सोय असल्याने येथे देशातील/परदेशातील संशोधक विद्यार्थी येत असतात. त्याच धर्तीवर शहरातील अभ्यासू व्यक्तिंना पत्रकार, इतिहासकार व संशोधक विद्यार्थी यांच्यासाठी वॉर्ड क्र.१०३, वेदांतनगर येथील रेखांकनातील खुल्या जागेत भगवान महावीर रिक्रेएशन हॉल बांधण्यात यावा. नूकतेच मा.जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद यांच्याकडून कार्यालयास पत्र प्राप्त झाले असून त्यामध्ये अल्पसंख्यांक समाजासाठीची कामे प्रस्तावित करण्याबाबत नमुद आहे. यासाठी शासनाकडून पुर्णत: अनुदान मिळण्याची शक्यता आहे. जैन समाज हा अल्पसंख्यांक संज्ञेमध्ये मोडत असून त्यांच्यासाठी शहरामध्ये यापुर्वी अशा स्वरुपाची इमारत संशोधन व इतर कार्यासाठी उपलब्ध नाही. तरी औरंगाबाद महानगरपालिकेत लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीच्या अनुषंगाने व देय एफएसआय मर्यादेत निधी मागणीचा प्रस्ताव त्यांच्याकडे सादर करणे बाबतचा व या कामाचे अंदाजपत्रक सादर करणे बाबतचे प्रशासनाला निर्देश देण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विकास रतनलाल जैन **अनुमोदक:-** श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील अभ्यासू व्यक्तिंना, पत्रकार, इतिहासकार व संशोधक विद्यार्थी यांच्यासाठी वॉर्ड क्र.१०३, वेदांतनगर येथील रेखांकनातील खुल्या जागेत भगवान महावीर रिक्रेशन हॉल बांधण्याकरीता शासनाकडून यास पुर्ण अनुदान मिळणार असून त्यानुसार विकास नियंत्रण नियमावलीच्या अनुषंगाने व देय एफएसआय मर्यादेत निधी मागणीचा प्रस्ताव त्यांच्याकडे सादर करणे बाबतचा व या कामाचे अंदाजपत्रक सादर करणे बाबतचे प्रशासनाला निर्देश देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०८, हमालवाडा, सिल्कमिल कॉलनी येथील श्री.सय्यद सोहेल सय्यद अजमल, वय वर्षे १८ हे रस्त्यावरून जात असतांना पडेगाव येथे कादरी हॉस्पीटल समोर झाड अंगावर पडून गंभीर जखमी झाला व त्यामुळे त्याचा मृत्यु झाला. त्याच्या घरची परिस्थिती अत्यंत गरीबीची असून त्यांना मनपातर्फे रु.१० लाख आर्थिक मदत देण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप, श्री.खान अय्युब म.हुसेन खान

**अनुमोदक:-**श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद, श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोद्दीन, श्रीमती वैशाली कारभारी जाधव.

श्री.अब्दुल नविद अब्दुल रशिद :मा.महापौर, कृपया नावा मध्ये श्री.सय्यद शोएब कादरी सय्यद अजमत कादरी अशी दुरूस्ती करण्यात यावी.

मा.महापौर :विषय दुरूस्तीसह मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०८, हमालवाडा, सिल्कमिल कॉलनी येथील श्री.सय्यद शोएब कादरी सय्यद अजमत कादरी,वय वर्षे १८ हे रस्त्यावरून जात असतांना पडेगाव येथे कादरी हॉस्पीटल समोर झाड अंगावर पडून मयत झालेल्या यांच्या कुटूंबीयांना मनपातर्फे रु.१० लक्ष आर्थिक मदत देण्यासाठी प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७३०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.प्रविण रावण शिंदे, विशालनगर, औरंगाबाद हे आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स स्तराचे खेळाडू असून आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाच्या प्रशिक्षकपदी त्यांची निवड झाली आहे. तसेच त्यांची लहान बहीण ज्योती रावण शिंदे हीची सुध्दा भारतीय संघात खेळाडू म्हणुन निवड झाली आहे.

सदरील आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स विश्वचषक स्पर्धा या अजरबैजान या देशाच्या बाकु या शहरात होणार आहे. परंतु संबंधीत खेळाडुंची आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्यामुळे शहराचा नावलौकीक वाढविणेसाठी या खेळाडूंना प्रोत्साहीत करणे करीता व त्यांनी मागणी केली असल्यामुळे महापालिकेतर्फे त्यांना या देशात जाण्या-येण्यासाठी र.रु.२.६० लक्षची आवश्यकता आहे. तरी या खेळाडूंना महानगरपालिकेतर्फे र.रु.२.६० लक्ष आर्थिक मदत देण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत **अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.प्रविण रावण शिंदे, विशालनगर, औरंगाबाद हे आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स स्तराचे खेळाडू असून आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाच्या प्रशिक्षकपदी त्यांची निवड तसेच त्यांची लहान बहीण ज्योती रावण शिंदे हीची भारतीय संघात खेळाडू म्हणुन निवड झाली असल्याने महापालिकेतर्फे त्यांना या देशात जाण्या-येण्यासाठी र.रु.२.६० लक्षची आर्थिक मदत करण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७३१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती शेख समीरा तबस्सुम अब्दुल कादर ह्या अंमळनेर, नगर परिषद, शिक्षण मंडळ उर्दु शाळेमध्ये उपशिक्षिका म्हणुन सद्यस्थितीमध्ये कार्यरत असून त्यांचे मुळ गाव औरंगाबाद जिल्हा असून त्यांचे आई, वडील औरंगाबाद येथे कार्यरत असून ते नेहमी आजारी असल्याकारणाने त्यांची देखभाल करण्यासाठी औरंगाबाद येथे कोणीही नसून अंमळनेर नगर परिषद शिक्षण मंडळाकडून जा.क्र.-३१/६३/२०१६-१७ दिनांक १४.०२.२०१८ रोजी महानगरपालिका औरंगाबाद येथे एकतर्फी आंतरजिल्हा बदली करण्याबाबतचा प्रस्ताव कार्यालयास सादर केलेला आहे.

करीता, याबाबत सहानुभूतीपुर्वक विचार करावा. तसेच महराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक जिपब-४८१७/प्र.क्र.२८०/आस्था-९ दिनांक २९ जून २०१७ अन्वये हा शासन निर्णय प्रसिध्द करण्यात आलेला असून जर दोन्ही विभागात परस्पर संमती होत असेल तर अशी तरतुद असल्याने श्रीमती शेख समीरा तबस्सुम अब्दुल कादर, नगर परिषद शाळा क्र.०६, अंमळनेर यांची सेवा नगर परिषदेमधून औरंगाबाद महानगरपालिका सेवेत सामावून घेण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विकास रतनलाल जैन **अनुमोदक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अंमळनेर, नगर परिषद, शिक्षण मंडळ उर्दु शाळेमध्ये कार्यरत असलेल्या उपशिक्षिका श्रीमती शेख समीरा तबस्सुम अब्दुल कादर यांना औरंगाबाद महानगरपालिका सेवेत सामावून घेण्या करीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७३२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या दलित वस्तींचा सर्वांगीण विकास करण्याकरीता खालील प्रभागामध्ये अत्यावश्यक विविध नागरी सुविधा कामे करण्यासाठी शासनाच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत दलित वस्ती सुधार योजना सन २०१८-१९ या योजने अंतर्गत निधी उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | प्रस्तावित कामे | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१०७, ईटखेडा अंतर्गत एकतानगर गल्ली क्र.०१ व ०२ मध्ये सिमेंट कॉंक्रीटींग करणे. | रु.२० लक्ष. |
| २. | वॉर्ड क्र.१०७, ईटखेडा अंतर्गत प्रतिज्ञानगर गल्ली क्र.०३ व ०४ येथील रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटींग करणे. | रु.२० लक्ष. |
| ३. | वॉर्ड क्र.१०७, ईटखेडा अंतर्गत वैतागवाडी येथील विविध गल्ल्यांमध्ये सिमेंट कॉंक्रीटींग करणे. | रु.२० लक्ष. |
| ४. | वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत केसरसिंगपुरा येथे ड्रेनेज लाईन टाकणे व रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२५ लक्ष. |
| ५. | वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत रेल्वे क्वॉटर, पदमपाणी कॉलनी येथे ड्रेनेज लाईन व कॉंक्रीटींग करणे. | रु.३५ लक्ष. |
| ६. | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा येथे जलवाहिनी टाकणे. | रु.२५ लक्ष. |

| | | |
|---|---|---|
| ७. | वॉर्ड क्र.१२, जगदिशनगर ते न्यु पहाडसिंगुपरा देवानंदीनगर मार्गे रस्ते तयार करणे. | रु.४० लक्ष. |
| ८. | वॉर्ड क्र.१२, बेगमपुरा प्रभागात विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | रु.१५ लक्ष. |
| ९. | वॉर्ड क्र.६८, संसारनगर येथील बौध्द विहाराच्या सभागृहाचा विकास करणे. | रु.१५ लक्ष. |
| १०. | वॉर्ड क्र.६८, समर्थनगर अंतर्गत संसारनगर व भोईवाडा येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | रु.४० लक्ष. |
| ११. | वॉर्ड क्र.६८, समर्थनगर अंतर्गत संसारनगर येथील विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु.२० लक्ष. |
| १२. | वॉर्ड क्र.११२, शिवाजीनगर अंतर्गत महापालिका आरोग्य केंद्र ते इंदिरानगर पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.४० लक्ष. |
| १३. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | रु.३० लक्ष. |
| १४. | वॉर्ड क्र.७५, बौध्दनगर अंतर्गत श्री.साळवे यांच्या घरापासून ते नाल्यापर्यंत कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२५ लक्ष. |
| १५. | वॉर्ड क्र.७५, बौध्दनगर अंतर्गत किर्ती कलेक्शन ते नाल्यापर्यंत कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२५ लक्ष. |
| १६. | वॉर्ड क्र.७५, उत्तमनगर अंतर्गत श्रध्दा चाट भंडार ते उत्तमनगर नाल्यापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२० लक्ष. |
| १७. | वॉर्ड क्र.०३, एकतानगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१० लक्ष. |
| १८. | वॉर्ड क्र.१७, विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२५ लक्ष. |

**सुचक:-**श्री.विकास रतनलाल जैन, श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत, श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे, श्री.गजानन भानुदास मनगटे, श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे.

**अनुमोदक:-**श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे, श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ, श्री.राजगौरव हरीदास वानखेडे. श्री.सचिन सुर्यकांत खैरे, श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे,

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या दलित वस्तींचा सर्वांगीण विकास करण्याकरीता खालील प्रभागामध्ये अत्यावश्यक विविध नागरी सुविधा कामे करण्यासाठी शासनाच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत दलित वस्ती सुधार योजना सन २०१८-१९ या योजने अंतर्गत निधी मिळण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | प्रस्तावित कामे | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१०७, ईटखेडा अंतर्गत एकतानगर गल्ली क्र.०१ व ०२ मध्ये सिमेंट कॉंक्रीटींग करणे. | रु.२० लक्ष. |
| २. | वॉर्ड क्र.१०७, ईटखेडा अंतर्गत प्रतिज्ञानगर गल्ली क्र.०३ व ०४ येथील रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटींग करणे. | रु.२० लक्ष. |
| ३. | वॉर्ड क्र.१०७, ईटखेडा अंतर्गत वैतागवाडी येथील विविध गल्ल्यांमध्ये सिमेंट कॉंक्रीटींग करणे. | रु.२० लक्ष. |

| | | |
|---|---|---|
| ४. | वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत केसरसिंगपुरा येथे ड्रेनेज लाईन टाकणे व रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२५ लक्ष. |
| ५. | वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत रेल्वे क्वॉटर, पदमपाणी कॉलनी येथे ड्रेनेज लाईन व कॉंक्रीटींग करणे. | रु.३५ लक्ष. |
| ६. | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा येथे जलवाहिनी टाकणे. | रु.२५ लक्ष. |
| ७. | वॉर्ड क्र.१२, जगदिशनगर ते न्यु पहाडसिंगुपुरा देवानंदीनगर मार्गे रस्ते तयार करणे. | रु.४० लक्ष. |
| ८. | वॉर्ड क्र.१२, बेगमपुरा प्रभागात विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | रु.१५ लक्ष. |
| ९. | वॉर्ड क्र.६८, संसारनगर येथील बौध्द विहाराच्या सभागृहाचा विकास करणे. | रु.१५ लक्ष. |
| १०. | वॉर्ड क्र.६८, समर्थनगर अंतर्गत संसारनगर व भोईवाडा येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | रु.४० लक्ष. |
| ११. | वॉर्ड क्र.६८, समर्थनगर अंतर्गत संसारनगर येथील विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु.२० लक्ष. |
| १२. | वॉर्ड क्र.११२, शिवाजीनगर अंतर्गत महापालिका आरोग्य केंद्र ते इंदिरानगर पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.४० लक्ष. |
| १३. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | रु.३० लक्ष. |
| १४. | वॉर्ड क्र.७५, बौध्दनगर अंतर्गत श्री.साळवे यांच्या घरापासून ते नाल्यापर्यंत कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२५ लक्ष. |
| १५. | वॉर्ड क्र.७५, बौध्दनगर अंतर्गत किर्ती कलेक्शन ते नाल्यापर्यंत कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२५ लक्ष. |
| १६. | वॉर्ड क्र.७५, उत्तमनगर अंतर्गत श्रध्दा चाट भंडार ते उत्तमनगर नाल्यापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२० लक्ष. |
| १७. | वॉर्ड क्र.०३, एकतानगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१० लक्ष. |
| १८. | वॉर्ड क्र.१७, विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२५ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर सभा राष्ट्रगिताने संपविण्यात आल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

**स्वाक्षरित/-**
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

**स्वाक्षरित/-**
महापौर
महानगरपालिका औरंगाबाद